# वऱ्हाडसमाचार.

THE BARAR SAMACHAR

VOL XVIII AKOLA MONDAY APRIL 14 1884 NO 22

वर्ष १८ अकोला सोमवार तारीख १४ माहे एप्रील सन १८८४ इ० अंक २२


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाची आगाऊ | ५ |
| सहामाही ,, | ३ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांक हांशील. | |
| वर्षाचे आगाऊ | ०१३ |
| सहामाही | ०८ |
| साल अखेर | १०८ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरूं केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०३ |


*WONDERFUL SARSAPARILLA!*

This preparation containing all the medical properties of the valuable drug Sarsa, combined with some other useful ingredients, is *guaranteed* to cure obstinate skin diseases, syphilitic eruptions, constitutional syphilis, loss of appetite Nervous and General Debility, costiveness, venerial sores, and all other affections arising from the abuse of mercury.

*per bottle Rs* 1 *Packing As* 4 *Per doz Rs* 11.

Specifics for Spermatorrhœa Gonnorrhœa, Gleet, Syphilis, and impotence. In bottles Rs. 2 and Rs. 4 Packing Ans. 4 *Cure guaranteed* In failure the money will be returned.

CURE FOR HYDROCELE.

*Guaranteed* to cure cases to long standing. Warranted to be free from mercury or other injurious drugs. In pots Rs. 2 and Rs. 4 Packing Ans. 4 Per doz. Rs. 21 and Rs. 40

W. Roodor and Co
Surgeons Calcutta


## स्त्री पुरुष तुलना.

साहसी कोण? पुरुष किंवा स्त्रिया? हा सुरस निबंध सौ० ताराबाई शिंदे यां नीं रचिला आहे. पुस्तकें पुणें येथें श्री शि-

वाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलढाणें एथील रा० रा० बापुजी हरी शिंदे हेड क्लार्क नि० डे० कमिशनर यांजकडेस व अकोलें एथें वऱ्हाड समाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणे पुस्तक घेणारांस टपालहांसील पडणार नाहीं पैसा पाठविणारानें वर्तल्या सुद्धा टिकाटें पाठवावी.

---

नोटीस.
नादारी मुकदमा नंबर ४
सन १८८४.
नमुना ( जी )

विद्यमान नादारी कोर्टाचे जड्ज्य जिल्हे अकोले. याचे कोर्टातून

तमाम सर्व लोकांस कळविण्यांसाठीं नोटिस देण्यांत येते कीं, शेख बिहाम वलद शेख चांद रहाणार पंचगव्हाण जिल्हे अकोलें हा नादारी आहे असा आज तारीख ९ माहे एप्रिल सन १८८४ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि ता० ३ माहे मे सन १८८४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकरतां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाइनीं नेमून देण्याकरतां व नादारानें आपले सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरतां नेमला आहे. नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटिस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याजबद्दल ज्या साक्षी समक्ष करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटिस नेमण्याकरतां नेमले ल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पडताळ्या करतां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांणीं आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दुसरे रहाणारे असतील त्यानीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरा पुढें तीच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दोव रजिस्टरीं दाखल होतील तारीख ९ माहे एप्रिल सन १८८४ इसवी.

( Signed) H. Nicholetts.
नादारी कोर्टाचे जज्ज.

## "एका नकल नविसाचा विलाप"

[ लि० का० म० ]

जल तुंबतां तडागीं फोडावा लागतो असा पाट ॥ शोक कोणी रोदन हृदय स्थैर्या नसे दुर्निवाट॥

पत्रकर्ते महाराज वरील आर्येचा भावार्थ आपणास कळलाच असेल कीं तडागामध्यें उदकाचा अतिसंचय झाला ह्मणजे त्यांतील पाणी बाहेर घालवावें लागतें, त्याच न्यायानें अतिदुःख झालें असतां ते रोदनानें शमवावें लागतें. यशिवाय दुसरा उपाय बराबा दिसत नाहीं. या न्यायास अवलंबून मी खालीं चार ओळी कविता रूपात्मक आपणाकडेस पाठविल्या आहेत त्यांनां आपल्या सुंदर अंकीं जागा मिळावी अशी विनंती आहे.

महान पापिष्ट असें तो पामर,
ज्यासी नकलकार जनीं ह्मणती॥१॥
उमेदवार आहे ज्याचा उपनाम॥
करीना प्रणाम त्यासी कोणी ॥२॥
प्रेमे आह्मां प्रति कोणी न बोलतो॥
तिरस्कार येतो वांटे आमुच्या॥३॥
सर्व ही मानिती आह्मा सदा नीच॥
नसे ज्या कोणीच त्राता कधीं॥४॥
आधी रूपी आहे खरे त्या जनन॥
करितां मनन सत्य भासे ॥५॥
केली यानें सदा काम न कळेचे॥
सन्मान ती वेचे सर्व आमुचा॥६॥
परिसातें दुःख वंदूं लाजिरवाणें॥
ऐकोत शहाणे एक चित्तें ॥७॥
सत्य जरी बोलूं असत्यची भासे॥
करविल हासे लोकां माजी॥८॥
स्नेही जाणानीं या कोणाशीं बोलतो॥
अपमान हाता येतो आमुच्या॥९॥
आमुच्याशीं स्नेह नित्य वाटे सर्वां॥
करिती बरवा शुद्ध भाव॥१०॥
चालतां विटाळे काया आमुचे संगें॥
यंत्रावण संगे पार्श्व भागीं॥११॥
मिताक्षरी भाषा येणें आमुचे साठीं॥
घेतली या पाठी माळी दान॥१२॥
आमुच्या नमस्कारा प्रत्युत्तर नाहीं
नंदीसम कांहीं करिता ती॥१३॥
राजाश्रित नर दश मुद्रा धारी॥
त्यासी आज्ञा धारी होणें घडे॥१४॥
नाहीं तरी क्षोभे जैसा नरहरी॥
ह्मणविती अरी कम्प्युचा ॥१५॥
समुद्रावें पाणी जरी खळखळे॥
आह्मावर्म कळे त्याचे खरें॥१६॥
प्रारब्धाचा ठेवा भोगणें हा प्रास॥
आमुच्या बोलें अर्थ होणें काय॥१७॥
कारण वांचूनी आमुचा येतो वीट॥
ह्मणती उद्धट मूर्ख पाजी॥१८॥
ऐसी या वेळे सी आठवेना कोणी॥
एका चक्रपाणी वांचोनीया॥१९॥
लोकां तीची स्थिती कथियेली आतां॥
स्वगृहीं पहातो अधीकता॥२०॥
कुटुंब आमुचे आहे फार मोठें॥
संदेह तो फिटे सांगू जरी॥२१॥
चिंता आमुची माया खरी आहे दासी॥
न सोडी देहासी क्षण मात्र॥२२॥
निंदा आमुची सुता जारीणी ती खरी॥
अनुग्रह करी परबुद्धी॥२३॥
पिता आमुचा आहे नाम ज्या दरोग
भोगविती भाग सर्वकाळीं॥२४॥
पांच पुत्र आमुचे दुःखें क्षीण होती
परी न मिळती पंचामींत॥२५॥
"रे" कारांत वाणी स्नुषा आमुची आहे
सर्व काळ राहे आमुचे गृहीं॥२६॥
भाग्य आमुचा भ्राता आहे नपुंसक॥
करविती शोक आपल्या गुणें॥२७॥
बंधुची ती माया विपदा ह्मणती॥
सोडीना कल्पांति देवराशी॥२८॥
ज्यार कर्मी आह्मी ऐसा गुणें झालों॥
शोकांत बुडालों संगें तीच्या॥२९॥
नामकरण करितां विसरलों माते॥
सांभाळी देहातें सदा आमुच्या॥३०॥
पुत्र स्नेहें पाळी माता शांती नाम॥
करून प्रमाण तिल्हा आधी॥३१॥
भाग्य आमुचे आह्मा ठेवो ऐसापरी॥
शरण मुरारी भक्ति भावें॥३२
एक आहे आह्मा इष्ट नारायण॥
धावे जो निर्वाण आमुचे काजीं॥३३॥
शरण मी तुला आलें लोक पाळ॥
गोविंदा गोपाळा ऋषिकेशी ॥३४॥

' एक दुष्कर्मी '

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ४ शके १८०६

## वऱ्हाड शाळाखात्याचा वार्षिक रिपोर्ट.

(ता० ३१ मार्चचे अंकावरून पुढें चालूं.)

वऱ्हाडांतील शाळांचे फीचे दर जरी इतर आसपासचे प्रान्तापेक्षां कमी आहेत तरी वरच्या इयत्ता मधून मुलांची संख्या वाढत असल्यामुळें मागील चार वर्षांपासुन फीचें उत्पन्न वाढत चाललें आहे. नीच जातीचीं व ह्या प्रान्तांतील मूळचे राहणारे गोंड वगैरे लोकांचीं मुलें खेरीज करून दुसरीं मुलें नादार घेतलीं जात नाहींत व फी जमा होण्याची अमुक एक मुदत ठरविली आहे त्या मुदतींत फी जमा न झाल्यास मु-

आणी नवे काढिली जातात ह्मणून इतर प्रांतांतील फीच्या दरा पेक्षां इकडील फीचे दर जरी कमी आहेत तरी एकंदरींत फीचें उत्पन्न इतर प्रान्तांशीं ताडून पाहिलें असतां बरें आहे असें डायरेक्टर साहेब ह्मणतात.

एज्युकेशन रिपोर्टावरून कळतें कीं वऱ्हाड शाळाखात्याच्या एकंदर खर्चाचा ७.६९ मात्र खर्च फीच्या योगानें भागतो; व एकंदर हिंदुस्थानांतील फीच्या उत्पन्नानें शेकडा १३.९ खर्च भागतो. वऱ्हाडांत वरिष्ट प्रतीच्या शिक्षणाकडेस जो खर्च लागतो त्याचे मानानें फीचें उत्पन्न शेकडा १.७६ होतें व त्याच मानानें एकंदर हिंदुस्थानांत शेकडा १३.९१ फीचें उत्पन्न होतें मि. हावेल यांचें मत होतें कीं 'वऱ्हाडांतील वरिष्ट प्रतीच्या व कनिष्ठ प्रतीच्या शिक्षणाच्या फीच्या दरांत योग्य प्रमाण नाहीं व शेतकरी लोकांस त्या शिवाय सेवा धावा लागतो ही गोष्ट लक्षांत आणली असतां तें प्रमाण फारच अयोग्य दिसतें" मि. रिसडेल यांचें ही मत आहे कीं "वरिष्ट प्रतीच्या शिक्षणाचे दर वाढवावेत ते असे कीं त्या संबंधी खर्च त्याचे उत्पन्नांतूनच भागला जाईल व अखेरीस लोक आपापल्या हातीं तें काम घेतील". एज्युकेशन कामिशननें ही मत असें आहे कीं 'वरिष्ठ व कनिष्ठ प्रतीच्या शिक्षणाच्या संबंधानें सरकारच्या रकमेशीं संबंध अगदीं निराळा आहे; व वरिष्ट प्रतीच्या शिक्षणास लोकांकडून योग्य मदत मिळाली तरच सरकारांतून तत्संबंधी लोकांकारितां सोय व्हावयाची."

दरमहा फीच्या उत्पन्ना खेरीज एकादा एखादा मुलगा शाळा सोडून गेला असतां दुसऱ्यानें त्याला त्याच शाळेंत आपलें नव घालणें ह्मणून त्यास फीच्या दुप्पट दंड घेण्याची काहीं जिल्ह्यांत वऱ्हाडांमध्यें चाल आहे; परंतु अशा फीचें उत्पन्न एकंदरींत कमी असून त्या पासून जो हेतु सिद्धीस जावयाचा तो न जातां उलटी मुलांची संख्या अशा प्रतिबंधामुळें कमी होण्याची भीति असल्यामुळें शाळाखात्याच्या कित्येक अधिकाऱ्यांचें मत असें पडलें कीं ही फी माफ असावी व मे० रेसिडेंट साहेबांनीं ती माफ होण्याविषयीं अनुमोदन दिलें आहे. व त्याप्रमाणें हायस्कुलें खेरीज करून सर्व शाळांतून ह्या महिन्यापासून ही फी माफ झाली आहे असें कळतें.

वऱ्हाडांत डा. लिथ साहेबांनीं जे प्रथमतः फीचे दर घालून दिले होते त्यात सुमारें पांच वर्षांपूर्वी रा. ब. दाडेकर यांनी थोडे फेरफार केले ते मिडल आणि हायस्कुलांच्या इयत्तेतच केले. व आतां त्यान इयत्तांची फी गोऱ्या प्रमाणानें वाढविली असतां चालण्या जोगें आहे. मुंबई इलाख्यांतील त्याच इयत्तेतच जी फी आहे त्या पेक्षां पुष्कळ कमी ह्मणजे सरासरी त्याचे निम्मे फी वऱ्हाडांत आहे. वऱ्हाडांतील शाळांमध्यें वरच्या इयत्तेतील मुलांची संख्या नुकतीच वाढत चालली असतां इतक्यांतच ह्या इयत्तांची फी वाढविली असतां कदाचित या वृद्धीची गती कुंठित होण्याचे जरी भीति आहे तरी निःपक्षपात बुद्धीनें असें ह्मणतां येईल कीं वऱ्हाडांतील वरिष्ट प्रतीच्या शिक्षणाचे दर थोड्या प्रमाणानें वाढविले असतां चालेल पण तसे करतांना एक गोष्ट मात्र केली पाहिजे. वऱ्हाडांत नादार मुलें घेण्याची मुळीच चाल नाहीं त्या मुळें पगारी विद्यार्थी खेरीज इतर गरीब मुलांस ती मिळविण्याची फार पंचाईत पडते. मुसलमान लोकांस तर लोअर क्लास या इयत्तेपासूनच फी देण्याची मोठी मारामार पडती त्यांसाठी हलकी फी ठरवून असें वर्षाची संख्या वरच्या इयत्तेंत इतकी कमी आहे तर हे दर वाढल्यावर जर त्या इयत्तेंत नादार घेण्याची परवानगी न मिळाली तर वरिष्ट प्रतीच्या शिक्षणाच्या संबंधानें यांची गति ह्या पेक्षां ही कुंठित होईल. तसेंच नीच जातीच्या मुलांस मिडल व हायस्कुलाच्या इयत्तेत फी माफ असावी. मुंबई इलाख्यांत सोनार देशस्थ मुलें नादार निराळे आहेत तसेच ह्या आतां इकडे सुरू केले तर वरच्या इयत्तांचे वाढविणें आणि न वाढविणें सारखेच होणें आहे तरी सर्व इयत्तांचे फीचे दर मुंबई इलाख्यांतील दरा प्रमाणें होई पावेतों ते तसेच राहूं द्यावेत. मुंबई इलाख्यांतील शेतकऱ्या पेक्षां इकडच्या शेतकऱ्यास सोस ही कमीच आहे असून वरच्या इयत्ते मधून देखील सोस देणारांच्या मुलां पासून इतर मुलां पेक्षां फी कमी घेण्याची जरुरी दिसत नाहीं.

फी शिवाय शाळाखात्यास उत्पन्नाच्या दुसऱ्या देन बाबी आहेत एक तर लोकां कडून व दुसरें मुनसिपालिट्यां कडून शाळांस मदत मिळते. मागील कांहीं वर्षा पासून लोकांची मदत अधिकाधिक होत चालली आहे. सन १८८० - ८१ सालांत ७५१२-८-९ व त्याचे पुढचे सालीं १०३८१-११-३ रुपये जमले असून ह्या सालांत १६८१-०-१० रुपये जमा झाले. ह्या सालच्या रकमे पैकीं ८१३९ रुपये शाळागृहें बांधण्याकरितां जमले त्यांत ४६१४ फक्त उमरावती जिल्ह्यांतील आहेत. असिस्टंटमास्तराच्या पगाराबद्दल ६८४ व गरीब मुलांच्या फी बद्दल ४८० रुपये लोकांकडून मिळाले. ही मदत बहुधा लोअर क्लास स्कुलास त्याच गांवच्या राहणाऱ्या लोकांकडून मिळते. व ते ती मोठ्या खुषीनें देतात असे डायरेक्टर साहेब ह्मणतात. वरिष्ट प्रतीच्या शिक्षणाच्या शाळांस त्या शिक्षणाची उपयोग फार जरुरी आहे अशा लोकांकडून बिलकुल मदत होत नाहीं. ह्याचें कारण डायरेक्टर साहेब असें देतात कीं वऱ्हाडांत प्रथमतः शाळाखातें सुरू झालें तेव्हांच वरिष्ट प्रतीच्या शिक्षणाच्या शाळा जरूरी पेक्षा अधीक स्थापिल्या गेल्या त्यामुळें वऱ्हाडा बाहेरून नोकरीच्या अगर इतर व्यवसायाच्या निमित्तानें वऱ्हाडांत आलेल्या लोकांस आपल्या मुलांच्या शिक्षणाच्या सोयीकरितां खर्च करणें लागल्या नाहींत व ह्मणून या संबंधानें यांचे हातून कांहीं मदत झाली नाही. मे. रेसिडेंट साहेबांची अशी सूचना आहे कीं ज्या अर्थी बाहेरून गृहस्थांचीं मुलें वऱ्हाडांतील शाळांत शिकतात त्या अर्थी त्यांनीं या शाळांस मदत दिली पाहिजे. कारतोकरितां व बक्षिसें करण्याकरितां ही बरीच मोठी रक्कम शाळांत मिळते. आजपावेतों ज्यांनीं ज्यांनीं पैशाच्या मोठ्या रकमा दिल्या त्यांस मे. रेसिडेंट साहेब व कमिशनर साहेब यांच्या सहीचीं सर्टिफिकिटें मिळाली आहेत व अशा प्रकारच्या राजमानाचा स्पर्धा आमच्या वऱ्हाडच्या लोकांत उत्पन्न झाल्या मुळें एक जण हजार हजार रुपये देत आहे.

मुनसिपालिट्यां कडून ह्या सालांत २०४८ रुपयांची मदत मिळाली. अकोलें जिल्ह्यातील अकोला खामगांव व शेगांव ह्या तीन मुनसिपालिट्यां मिळून १४४८ रुपये मिळाले. वऱ्हाडांतील मुनसिपालिट्यांच्या एकंदर उत्पन्नाच्या मानानें पाहिलें असतां वऱ्हाड शाळाखातास मुनसिपालिट्यां कडून त्यांच्या उत्पन्नाच्या मानानें फक्त शेकडा २ मदत होते. व शाळा खात्याच्या एकंदर खर्चाच्या मानानें पाहिलें असतां ही मदत फक्त शेकडा ३९ होते. परंतु एकंदर हिंदुस्थानांतील शाळा खात्यास त्यांचा खर्चाच्या मानानें शेकडा २. ५६ खर्च होतात. आणि या मानानें पाहिलें असतां वऱ्हाडच्या मुनसिपालिट्यां कडून इतर प्रांतापेक्षा सुमारें $\frac{1}{6}$ रकम कमी मिळते. एज्युकेशन कमिशनचें अभिप्राय आहे कीं मुनसिपालिट्यांनीं ह्या कामीं किती रक्कम द्यावी हें स्थानिक सरकारानें ठरवावें पण मे. रेसिडेंट साहेबांनीं या गोष्टीचा योग्य विचार करण्याचें मुनसिपालिट्यां वरच तूर्त सोपिलें आहे.

---

As promised in our last, we purposely make space in our to-day's issue for the English verses that were read, as stated previously, by Krishnarao Purushottom Bhat, a student of the Matriculation class of this year, at the time of the Pansupari entertainment that the students of the Akola High school held in honor of their respected Head master, Mr G. C. Aitken on the eve of his departure to England on two years' leave on medical certificate.

Good friends and gentlemen we meet today,
And homage due our worthy Aitken pay.
He worked in Province this as you all know
For near a term of twenty years, but oh!
The time fast comes when he his pupils leaves
His health by rest t'improvè as he believes.
For this he goes on leave to England's shore
And sorrow deep in every heart does store.
Few English—men stay out in India long
But run to mother—land t'which they belong.
He did not act like them but spent his youth
In moulding Indian minds that were uncouth.
From under his tuition have there gone
Many a grateful student that outshone
The Bombay scholars and got titles high
From year to year as none can e'er deny;
Sometimes the success gained was very slim
But then 'twas wrong t'impute the fault to him.
As for our part we freely do confess
And that the fault with students lay profess.
That each effect from divers reasons springs
Is a plain truth t'which none objection brings.
On this think and divest, we pray, your mind
Of all ill-will that room in it may find.
His work was very hard in province this
None could have moved with patience less than his.
To outward view much stern he does appear,
But kind at heart for which we him revere.
Great good to us is done by him, no doubt,
Which we will bear in mind till life is out.
His favours large to us endears him more
For which his ever presence we implore.
Our Aitken's work extends o'er twenty years
For this we offer him our hearty cheers.
But he vacates his post so nice and high
Intending for a while good rest t'enjoy.
So let us all conjointly pray, I say,
That every happiness enjoy he may.
Let him enjoy the leave he has obtained
And gain the loss of strength he has sustained.
Let him in safety go to native land,
And soon return to be with us at hand.
And now turn we to you and thus implore
To keep the same kind eye your pupils o'er.
Let our best int'rests be stored in your heart
Although from us anon you do depart.
Our minds do edify with counsels sound
And thus endeavour hard to bring us round.
In short, remember us though home you go
To children of Berar kind wishes show,
Accept our heart—felt thanks for all you've done
As here for years full two your course is run.
In you we say full trust do we repose
And with this humble prayer I beg to close.

The Berar Samachar
MONDAY, april, 14, 1884

The reconstitution of the Berar Commission has, we understand, produced no small measure of dissatisfaction among those affected. This is not unnatural, as by the new arrangement several Assistant Commissioners, who have been long in the service, will be considerable sufferers in a pecuniary sense. For instance, Lieutenant-Colonel Grant, B.S.C., and Mr Nicholetts have both been placed in the second class on a salary of Rs,700 per mensem, though their substantive salary is Rs. 800. Then again Major Thompson R.A. B.S.C, of Buldana; Mr. Elliott, of Yeotmal; and Mr. Hare, of Khangaon, have been placed in the 3rd class on Rs 500 per mensem, though their substantive personal pay is Rs, 200 an excess of that amount. In the case of Colonel Grant the anomaly is partially removed by giving him an allowance of Rs. 100 as judge of the court of Small Causes. This he will continue to receive so long as his salary, including the allowance, does not exceed Rs, 900, a prospect which at present appears to be somewhat remote. Mr. Davies, Assistant Commissioner, 3rd class, is more fortunate, as he is permitted to draw a personal allowance of Rs,150, rising to Rs,200 after two years, and continuing at that amount until he is promoted to the second grade in the new establishment Mr Knowlys, Assistant Commissioner, Ellichpur, is placed in the Ist class on Rs, 900 per mensem.

---

The following is an extract from the London letter to the *Times of India*:—

Mr. Gorst, M. P., has been interviewed with reference to his Indian tour, and seems to have expressed himself with tolerable confidence and freedom regarding *Hyderabad* affairs. He says he made a thorough investigation into revenue, expenditure, and finances of the state, and the result was not at all satisfactory. Wasteful extravagance venal corruption, and grinding taxation he found to be the leading features of the financial administration, or rather maladministration. He says he finds that the revenue collected from the wretched ryots amount to upwards of £2,000,000 annually and "this is spent for the most part in keeping up an unnecessary army, in providing for a perfect host of useless officials, and in paying perpatual pensions which are granted on all sorts of pretexts to the retainers of the court-" In illustration of this the hon. member says that when the heir of the young *Nizam* was born on the spot no fewer than fourteen persons were granted perpatual pensions." Further, "the country is miserably provided with roads, and water tanks which existed centuries ago in many cases have been allowed to fall into decay. The money which is set aside for these purposes seldom finds its way beyond the pockets of the local officials. * * * This is to be said for the peccant officials, that their salaries are always in arrear, and to satisfy the first principle of life they hold back and extort when they can." The administration of justice in Hyderabad also comes in for the service stricture of Mr. Gorst. As to his remedy for the present codition of affairs, Mr Gorst says there are several methods each of which might be urged on different grounds. Since it is the settled policy of the Indian government not to absorb more of the native state, Mr. Gorst seeks no remedy in that direction but he considers that the power of the British Resident ought at least to be increased to such an extent as to secure a better administration of justice and revenue.

Sir Oliver St John had arranged to leave Simla, to take up the officiating appointment of Resident at Hyderabad on Monday evening *It* is understood that the appointment was offered to Mr J B Lyall, Commissioner of Mysore, and declined by that gentleman

According to a telegram from Secunderabad Mr Cordery was to have left there on Tuesday for England *via* Bombay "He proposes to meet Sir O St John at the latter place and to hand over the administration of the Hyderabad Residency to him there Sir Oliver is expected here on the 11th instant His coming has given rise to considerable comment among the city politicians, who argue that it is a long way from Kashmere to Hyderabad for such a temporary appointment, but I believe there is no doubt that Mr Cordery will return to Hyderabad on the expiration of his leave

Major Gunthorp, *M. S. C.*, District Superintendent of Police, Akola, proceeds at once on two years' furlough; Mr Wright, D. S. P., of Amraoti, has proceeded on three months' privilege leave, as also Mr Heath, D. S. P., of Buldana, their places being filled up by Messrs. Yezidar Vicaji and C. A. Fraser, Assistant Superintendent, respectively.

Mr J Craig, Executive Engineer, 2nd grade, is confirmed in the appointment of Assistant Superintending Engineer Assistant Secretary to the Resident, *Hyderabad, vice* Mr T Hamilton, M. I. C. E, (now on furlough), transferred to East Berar (Amraoti Division), Messrs, watts and Leslie, Executive Engineers, having proceeded on two and one and a half years furlough respectively to Europe, Mr Handley, Assistant Engineer, British Burmah has been transferred to the *Province*

The exports of cotton from *Berar* during the week ending the 15th ult amounted to 8,588 bales making the total number up to date during the present season 101,409 bales Of these 98,398 bales were sent to Bombay, 2,903 to the North-West provinces, 11 to Bengal, 26 to Khandeish, and 68 to the Central *Provinces*

*It* is stated that the Gaekwar of Baroda has offered an ample apology for the unintentional disrespect shown to General Watson by the state officials in neglecting to provide the customary salute and guard-of-honor on his recent return to the city

## वऱ्हाड.

मि. ग्रान्ट साहेब उमरावतीचे स्माल काज कोर्टाचे जज यांची मेजर दुलक साहेब यांचे जागीं नेमणूक झाल्यामुळें रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण यांस तीन महिने पावेतों उमरावती स्मालकाज कोर्टाचे जज नेमिलें व यांचे जागीं मि. खारदेसर दिनशाजी यांस आफिशिएटींग एक्स्ट्रा असिष्टंट कमिशनर नेमिलें असें कळतें.

रा. रा. बताशा रामचंद्र प्रधान हे दोन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर तारीख १५ मिनहू पासून जाणार व त्यांचे जागीं रा. रा. निळकंठ नारायण यांस नेमिलें आहे.

रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण काल रोजीं रात्रौ येथून आपले नागेवर रुजूं होण्याकरितां गेले. याचे सन्मानार्थ एथील हायस्कूलचे विद्यार्थ्यांनीं हायस्कूलांत पानसुपारीचा फार चांगला समारंभ केला होता. त्या समयास त्यांच्या मित्र मंडळीचा समाज बराच जमला होता. मि. देवराव विनायक यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिल्यावर त्यांकडे ट हा तांतील विद्यार्थी रंगराव नारायण यांनीं भाषण केलें. मराठी व फारशी भाषेंत तयार केलेल्या कविता वाचल्यानंतर मि. सदाशिव राव विष्णु भागवत यांनीं समयोचित भाषण केलें व त्यावर मि. तळवळकर यांनीं समर्पक उत्तर दिले नंतर पानसुपारी अत्तरे इत्यादि दिल्यावर अध्यक्षांनीं भाषणकरून सभा विसर्जन केला. मि. तळवळकर हे सुमारें महा वर्षापासून येथें आहेत. हे आपल्या सुस्वभावानें फार लोकप्रिय झाले होते. त्यांची मिजास फार गरीबी असून हरएक भागांत पुढारीपणा घेत असत.

मालगी महंमद निजामुद्दीन सुपरन्युमररी अ० कमिशनर ८६ दिवसांच्या हक्काचे रजेवर जाणार व त्यांचे जागीं मि० देवराव विकृष्ण यांची नेमणूक होणार असें कळतें अकोटच्या तहशीलदाराचे जागीं येथील हुजूर नाझर यांची शिफारस झाली आहे असें कळतें.

मि० गणेश गोविंद यांस मेहकरास व नवाब फिरोजखान यांस मंगरूळास १०० रुपयांपावेतों तसेंच मि० अलिमुद्दीन हुसेन अब्बासी यांस २०० रुपयापावेतों दिवाणी दावे चालविण्याचे अधिकार मिळाले आहेत.

मि० हामिल्टन यांची नेमणूक पूर्व वऱ्हाड भागास होऊन मि० क्रेग हैदराबादेस आसि० सु० इंजिनीअर व अ० सेक्रेटराचे जागीं कायम झाले.

मि० विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं ता० १२ रोजीं आपलें कामाचा चार्ज घेतला. आतां फर्स्ट असिस्टंटची जागा त्यांच्या संमतानें लवकर भरली जाईल.

वऱ्हाडांतील एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरांच्या जागेंत फेरफार होऊन ते तारीख ११ ज्यानेवारी सन १८८४ पासून अमलांत आले आहेत. एकंदर जागा १७ असून त्याचे पाच वर्ग केले आहेत. पहिल्या वर्गाच्या जागा २ असून पगार प्रत्येकाचा ६०० रु० आहे व त्यापैकीं एकीवर मि. वर्ड यांची नेमणूक असून दुसरी रिकामी आहे दुसऱ्या वर्गाच्याही २ जागा असून पगार ५०० रु० आहे व एकीवर पुरुषोत्तम राव नारायण यांची नेमणूक असून दुसरी रिकामी आहे तिसऱ्या वर्गाच्या ५ जागा आहेत व प्रत्येकीचा पगार ४०० रु आहे त्यापैकी पहिलीवर मि श्रीकृष्ण नरहर याची व दुसरीवर मि. आत्माराम भिकाजी यांची नेमणूक असून बाकीच्या ३ रिकाम्या आहेत. चौथ्या वर्गाच्या जागा ४ असून पगार ३०० रु आहे. त्यापैकीं पहिलीवर मि० रामराव गोविंद व दुसरीवर मि. केशव महिपत यांच्या नेमणूक असून बाकीच्या २ रिकाम्या आहेत. पांचव्या वर्गाच्याही जागा ४ आहेत. पहिलीवर मि. त्र्यंबक जनार्दन यांची व दुसरीवर मि. एच. ई. जे. फिट्झ पाट्रिक यांची नेमणूक असून २ रीकाम्या आहेत व एके जागीं मे. रेसिडेंट साहेबांनीं मि. देवराव जयकृष्ण यांची आफिशिएटिंग नेमणुक मंजूर करून ठेविली आहे. अशा या १७ जागां पैकीं ८ जागा भरल्या असून ९ रिकाम्या आहेत. परंतु ह्या लागलीच भरल्या जावयाच्या नाहींत. असिस्टंट कमिशनरांच्या यादी मध्यें सुपरन्युमररी म्हणून ज्या ६ असिस्टंट कमिशनरांच्या जागा आहेत ह्या जसजशा रिकाम्या होतील तसतशा ह्या रिकाम्या जागा भरल्या जातील व हल्लींच्या आफिसरास बढती मिळेल असा ठराव झाला आहे. आतां आफिसरांच्या संख्येच्या मानानें पाहिलें असतां तूर्त ३ जागा भरल्या जातील असें वाटतें पण ह्या ९ जागा मिळून एकंदर ३४०० रु० पगार आहे व सुपरन्युमररींच्या ६ जागेचा पगार ३००० आहे ह्या वरून खर्चाच्या मानानें पाहिलें असतां ४०० ची एक जागा भरली जाऊन शेवटच्या वर्गांत एकाची नेमणूक होईल असें दिसतें ह्या जागा मंजूर होऊन घेण्याची फार दिवसा पासून आशी वाट पहात होते व त्या मंजूर होऊन घेतांना. ह्या साला पासनच नवीन नेमणुका होऊन दिवाणी कामाची स्वतंत्र योजना होईल असें वाटत होतें पण तसें होण्यास आणखी अवकाश आहे असें दिसतें.

वाशीम जिल्ह्याचे पोलिस सुपरइंटेंडंट मि. एच. ए. हीथ व उमरावती जिल्ह्याचे पोलीस सु. मि. राईट यांनीं तीन महिन्यांची हक्काची रजा घेतल्या मुळें त्यांचे जागीं मि. सी. ए. फ्रेजर व मि. विकाजी यांस अनुक्रमें नेमिलें आहे.

## जाहिरात.

गेल्या आठवड्यांत नोटीस छापताना छापण्याची चुकी झाली आहे सबब ती रद्द करून खालीं लिहिल्याप्रमाणें नोटीस प्रसिद्ध करण्यांत येते आहे.

सर्व लोकांस असें कळविण्यांत येतें कीं अकोले येथें धान्याचा बाजार स्थापन करावयाचा त्या बद्दल तारीख ७ माहे अक्टोबर सन १८८३ इसवी रोजीं वऱ्हाड समाचार व उर्दु अखबार वर्तमानपत्रांत जाहिरात दिली होती परंतु मेहरबान वऱ्हाडचे सेक्रेटरी यांचे पत्र नंबर ४ तारीख ३ जानेवारी सन १८८४ इसवीचे आल्या वरून पुन्हां त्यावर विचार होऊन दर अधिक उणे करण्यांत आले आहेत ते खालीं लिहिल्या प्रमाणें:—

| | विकणारा पासून | विकत घेणारा पासून |
|---|---|---|
| दलाली | ८– | • |
| मापाई | ८– | ८– |
| मारकेटटेरा | ८–८६ | • |

लायसेन्स फी

| | |
|---|---|
| दलालास | ५ |
| मापारी यांस | २ |

येणें प्रमाणें फेरबदल झाला आहे तरी ह्याबद्दल कोणाची कांहीं हरकत असल्यास ह्या नोटिसीच तारखे पासून १५ दिवसांचे आंत लेखी अर्जांनीं मुनसिपाल कमेटीचे आफिसांत कळवावें तारीख ६ माहे एप्रिल सन १८८४ इसवी.

Deorao Vinayak
व्हाइस प्रेसिडेन्ट
अकोला मुनसिपाल कमेटी.

---

## वर्तमानसार.

कलकत्ता येथील बातमीदार कळवितो कीं:— येथें नवीन ब्राह्मविवाहाची बातमी ऐकून ती पत्रिकेंत दाखल करण्याच्या उद्देशानें आपणास लिहीत करावी असें वाटल्यावरून आपणास कळवितो. मुक्काम बाकीपूर येथें तारीख २९ मंगळवार रोजीं एक ब्राह्मविवाह झाला. वधूचें नांव श्रीमती सुखदाईनी वय २२ व वराचें नांव हेमचंद्र रायंडम वर्षे २६ आहे. विवाह नव्या संहितेच्या आधारानें झाला ( ब्रह्मसमाजाच्या मताप्रमाणें ) व सन १८७२ चा आक्ट ३ या अन्वयें रजिस्टरही झाला. विवाहविधि बाबु दिनानाथ मुजुमदार यांनीं चालविला. काल ता० २७ रोजीं येथील मेडिकल कालेजच्या लेक्चरहालमध्यें बाबु प्रतापचंद्र मुजुमदार ह्यांचें त्यांच्या पृथ्वी प्रदक्षणें विषयीं व्याख्यान झालें त्यांत इंगिलश, अमेरिकन, जपानी चिनी वगैरे लोकांचीं माहिती उत्तम प्रकारें थोडक्यांत दिलीं. व्याख्यान रात्रीं ८॥ वाजतां सुरूं झालें व १०॥ वाजतां संपलें.

न्यू सौथवेल्स प्रांतांतील माजी डेपुटी रजिस्ट्रार जनरल मि० डफ यांनीं अफरातफर केल्यामुळें त्यास [illegible] वर्षपर्यंत कैदेची शिक्षा झाली असें कळतें.

प्रिन्स आफ वेल्स हे आपल्या बंधुचें प्रेत घेऊन येण्यासाठीं फ्रान्सदेशीं गेले होते ते ता० २ रोजीं प्रेतासह विलायतेस येण्यासाठीं तारवावर चढलें असें ता० २ च्या तारेवरून कळतें!

न्युझीलंड येथील पार्लमेंट सभेच्या पिछाडीच्या खोलींत नुक्ताच विलक्षण व लज्जास्पद प्रकार घडला. कांहीं प्रकरणाविषयीं वाद चालला असतां मि० बुकानन आणि मि० बुइडम यांजमध्यें हमरेतुमरे होऊन शेवटीं उभयतां मारामारीवर आले आणि परस्परांस बरीच इजा करून घेतली. ही गोष्ट पार्लमेंट सभेंत जाहिर होऊन मारामारीस प्रथम सुरुवात करणारे मि० बुइस्डम यांस त्यांच्या ठिकाणीं बोलावून आणून त्यास त्यांच्या गैरवर्तनाबद्दल खुलासा विचारला तेव्हां त्यांनीं क्षमा मागितल्यावरून तें प्रकरण तेथेंच निवालें. धन्य या लोकांच्या प्रतिनिधीची!

ग्रेट ब्रिटन व ऐर्लंड या संयुक्त राज्यांतील वर्तमानपत्राची गणती सन १८४६ सालीं प्रथम केली तींत व हल्लींच्या गणतीत तिपटीहून अधीक अंतर पडलें आहे. ह्मणजे त्यावेळेस एकंदर ५५१ वर्तमानपत्रें निघत असून त्यापैकीं फक्त १४ दररोज निघत असत, हल्लीं त्यांची संख्या २०१५ पर्यंत वाढली असून पैकीं १७९ पत्रें दररोज निघतात!

ग्लेनार्म नांवाचें वाफेचें जहाज सिंगापुराकडे चाललें असतां मार्गांत मोठ्या समुद्रांत असोल्नात नांवाचें तारूं त्यास आढळलें हें तारूं गेल्या फेब्रुवारी महिन्यांत मोठ्या तुफानामुळें कोणीकडे भडकून नाहींसें झालें होतें. त्याजवर गोव्याचे तीन असामी उपासामुळें मरून पडलें होते व त्यांची शरीरें कुजून गेली होती बाकीची मनुष्यें समुद्रांत बुडून नाहींशी झाली असावींत.

टांकसाळ—गेल्या आठवड्यांत येथील टांकसाळेंत ३८,४९,४७१ रुपयांची चांदी शिलक होती, यांत आणखीं १६,९४,२१० रुपयांची नवी आली पैकीं ८,३६,०१७ रुपयांचें नाणें पाडून दिलें, व बाकीं ४७,०७ ९८९ रुपयांची शिलक आहे या शिवाय ८९,०१,६६३ रुपयांची खासगी व्यापाऱ्यांची चांदी परीक्षेकरितां येऊन पडलीच आहे.

खनिना—इसवी सन १८८३-८४ साला बद्दल १७,८०,००,००० रुपये हिंदुस्थानांतून रवाना व्हावयाचे. पैकीं ता० १ ली एप्रील १८८३ पासून मार्च २९ वी १८८४ पर्यंत १७,३७,८४,००० रुपये रवाना झाले आहेत. व आतां ३१ मार्च पर्यंत ४२,१६ ००० इतकेच काय ते पाठवायाचे राहिले आहेत.

रंगून स्माल्काज कोर्टाचा जज्जाच्या अद्वितीय वर्तनामुळें १९ आडव्होकेटांपैकीं १२ नीं कोर्टांत येण्याचें नाकारिलें आहे.

अपूर्व औदार्य—बेंगाल पब्लिक ओपिनियन मधून अशी एक बातमी पसरली आहे कीं महाराणी सुवर्णमयी यांच्या मनांत कौशिबझार येथें मुलाकरितां एक पाठशाळा व वैद्यक शाळा व मुलीकरितां फक्त एक वैद्यक शाळा स्थापन करावयाच्या आहेत यामधून निराश्रित मुलांस व मुलीस फुकट विद्या शिकविली जाईल इतकेंच नव्हें, तर त्यांची, खाण्यापिण्याची निजण्या बसण्याची ही सोय फुकट केली जाणार आहे. सदर सुवर्णमयीच्या मनांत ही गोष्ट खरोखर असेल आणि सुवर्णमयी (सुवर्णमयीस कोणती गोष्ट अशक्य आहे) ती करितील तर त्यांचे या आर्यजननीच्या निराधारी बालकांवर अनिवाच्य महत्उपकार होतील, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

म्युनिसिपालिटिवर धाड—कलकत्ता म्युनिसिपालिटीवर कोणी मि. अडरसन गृहस्थानें म्युनिसिपालिटीच्या गैरशिस्तपणामुळें झालेल्या आपल्या नुकसानीबद्दल फिर्याद केली होती, त्याचा निकाल होऊन नुकसानीबद्दल म्युनिसिपालिटीनें ६,५०० रुपये द्यावे असें ठरलें. पुढें म्युनिसिपालिटीनें यावर अपील केलें परंतु अपिलातही पूर्वीचाच हुकुमनामा कायम झाला. इकडे आमच्या बेफाम म्युनिसिपालिट्यांनीं अवधान असूं द्यावें. इं० प्र०

हिंदुस्थान सरकारानें लाविलेली इलबर्ट बिलाची तोडजोड विलायत सरकारास संमत नसून ते त्यांत ब्रिस्टल येथे ठरलेले फेरफार करण्याच्या विचारांत आहेत, अशी एक भूरटी गप्प इंग्रजी पत्रांतून उठली आहे.

पारीस येथील एका अमेरिकन बाईनें आपला फोटोग्राफ काढण्याचें मनांत आणून त्याबद्दल ७५००० फ्रांकांत एका प्रसिद्ध फोटोग्रांफराशीं ठराव केला.

किरणांच्या योगानें हजारोंहजार मैलपर्यंत गायन ऐकूं येण्याची युक्ति एका इंग्रजी कंपनीनें शोधून काढिली आहे.

पथूरा येथें एक नवीन तारा दिसूं लागला आहे.

मद्रासेंतील लोकांनीं तेथें 'महाराजसभा' या नांवाची एक सभा स्थापिली आहे.

प्रसिद्ध गणिती टाडहंटर हे गेल्या आठवड्यांत मरण पावले. ह. न्या.

---

नोटीस.

रा. पितांबर वल्लद रंभा भारती गोसावी व भगवानगीर वल्लद आत्मागीर गोसावी राहणार खीरोडे तालुके जळगांव. या उभयतास मिळून नोटीस देणार बालपुरी गोसावी राहणार मानारडी तालुके जळगांव यांजकडून कळविण्यांत येतें कीं, तुह्मी उभयतांनीं मिळून अनी नामें आमचे बायकोस माहेरीं ह्मणून रीतीप्रमाणें दिपवाळी सघेऊन गेला. दोनचार महिने ठेवून घेऊन लागलेच परत पाठविण्याची परंतु आज पावेतों आपण पाठवून दिली नाहीं. ह्मणून मी स्वतः तुह्माकडे खीरोडे येथें येऊन बायकोस पाठवून द्या मी नेण्या करितां आलों आहे तर तुह्मी पाठवित नाहीं ह्मणून सांगितलें नंतर मी पुनः तुह्माकडे दोन संभावित माणसें घेऊन आलो आणि बायकोस पाठवून द्या ह्मणून विचारलें तर तुह्मी न पाठवितां मजशी शिवीगाळ केली याजकरितां तुह्मांस ह्या नोटीशीनें कळवितों कीं नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत बायको आणून पोंचती करावी न केल्यास कोर्ट मार्फत काम चालवून सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. कळावें.

ता० ९ माहे एप्रिल सन १८८४ इ०

सही.

बालपुरी वल्लद दानपुरी गोसावी राहणार मानार्डी तालुके जळगांव दस्तुर रावजी वल्लद खानाजी पाटील मौजे मजकुर.

---

नोटीस.

रा. रा. रावजी वल्लद देवाजी राहणार सांगळोद यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुझशी माझें लग्न होऊन सुमारें दाहा वर्षे झालीं. त्या नंतर रीतीप्रमाणें सहा वर्षें सासर माहेर केलें. पुढें मी वयांत आल्यावर सहा महिने तुजपाशी होतें, नंतर मजला तूं अकरा महिने माहेरीं ठेविलें. नंतर माझ्या मामानें मजला घेतलें व स्वतः तुजकडे आला. परंतु तूं त्या वेळीं असें सांगितलेंस कीं, मजला ही ठेवून घेणें नाहीं व जरुरी नाहीं. त्याचवेळीं माझे मामानीं तुजला सांगितलें कीं तूं जर इजला ठेवून घेत नाहींस तर सोडचीठ्ठी देऊन हिच्यावरील सर्व हक्क सोडून दे त्यावेळीं तूं असें सांगितलें कीं, तुह्मी सरकारांत जाऊन फिर्याद करा मी सोडचिठ्ठी देत नाहीं व इजला नांदवीत नाहीं. त्यानंतर पुढें बरेच वेळा आह्मी तुजला तुझा चुलता व दुसरे तुझे नात्याचे लोक यांजपाशी सांगितलें परंतु तूं कांहीं मजला घेऊन गेला नाहींस व सोडचिठी ही दिली नाहींस याजकरितां तुजला ही नोटीस देऊन कळवितेस कीं नोटीस पावल्या पासून चार दिवसाचे आंत तूं मजला घेऊन जावें आणि आज चार वर्षांची पोटगी वगैरे खर्चाबद्दल रुपये १२५ मजला कर्ज झालें तर हे कर्ज मजला देऊन तूं घेऊन जावेस नाहीं तर सोडचिठी द्यावी असे न झालें तर रीतीप्रमाणें कोर्टांत फिर्याद करून ह्या नोटीशीच्या खर्चासुद्धा सर्व रुपये भरून घेतले जाईल कळावें. ता० ५-४-८४ इ०

सही.

सारजी मरगरावजी दस्तुर हात ची बांगडी

---

नोटीस.

रामभट बिन लक्ष्मण भट माजी गुमास्ते राहणार मौजे धानोरे तालुके जळगांव जिल्हा अकोले यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझा बाप शिताराम वलद झेलाजी पाटील हा जिवंत असतांना तुह्मी आमचे येथें पुष्कळ वर्षांपासून नोकर असून सर्व दुकानची व्यवस्था व घेवदेव तुमचे हातानीं होत होती माझा बाप आजमासे एक वर्ष मरण्यास झालें त्यावर तुह्मी आपणच होऊन नोकरी सोडून हिशोब न देतां घरीं बसला तेव्हांपासून पुष्कळवेळा तुह्मास सांगोन पाठविलें कीं दुकानचा हिशोब समजून द्यावा व समक्षही ह्मटलें आसतां तुह्मी आजपावेतों आशा नाहीं व हिशोबही समजून दिला नाहीं. तरी हल्लीं या नोटीशीनें कळविण्यात येतें कीं या नोटीशीचे तारखे पासून १५ दिवसाचे आंत आमचे दुकानचा हिशोब तुह्मी समजून द्यावा न दिल्यास कायद्याप्रमाणें कोर्टांत फिर्याद करून नुकसानीचें खर्चासुद्धा व या नोटीशीचे खर्चासुद्धा तुह्मापासून भरून घेण्यांत येईल कळावें. ता० ८-४-८४ इ०

सही भिकाजी वलद शिताराम व.
पा. मातोश्री सारजाबाई मर्द
शिताराम पा. तर्फे मुखत्यार
नारायण मोरेश्वर दस्तुर
खुद.

---

## बालामृत.

झाडास ज्याप्रमाणें वाढवावें त्याप्रमाणें वाढतें.

मुलांच्या ह्या दिवसांत प्रकृति बिघडून खोकला, किरीम, दमा, आंकडी, मोठी पोटें, बहुत पाणी पिऊन अगर अन्य कारणांनीं आजारी पडून त्रास होतो, त्याची वाढ खुंटते व भलतेच प्रसंग गुजरतात तर प्रत्येकानें ह्या अमृताचा उपयोग न करणें ह्मणजे रोग मुद्दाम घरांत आणणें असें होतें. ह्याच्या गुणाबद्दल दाखले चमत्कारिक मिळाले आहेत. हें फार नामीम औषध आहे. जंत, अन्न न पचणें, ओकणें, दूध न मिळाल्यानें पांढुरकी, क्षीणता, मोठीं पोटें, आईच्या क्षीणतेपासून काड्यासारख्या अस्थि, फार खाणें, हिरवी, काळी किंवा पांढरी हागवण, खोकला, फेंपरें, आंव अतिसार, आंकडी, घरघर, गळ्यामध्यें अवाज, पाय लटके पडणें, दमा, माती खाणें, खरूज, कंडु, फोड आईचा वाईट आहार किंवा रक्त किंवा कोणत्याही प्रकारच्या व्याधीपासून होणारे रोग तात्काळ दूर होतात. किंमत १ रुपया बंगी खर्च ८४ आणे सर्व माहितीचा कागद आंत आहे. मुंबईंत कांदेवाडी मेडिकल हालांत व वऱ्हाडांत, वऱ्हाड समाचार आफिसांत मिळेल.

विठ्ठल सदाशिव परांजपे

---

हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी यांचें "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XVIII AKOLA MONDAY APRIL 21 1884 NO 23

वर्ष १८ अकोला सोमवार तारीख २१ माहे एप्रील सन १८८४ इ० अंक २३


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु० |
| वर्षाची आगाऊ | ५ |
| सहामाही ,, | ३ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ४ |
| टांक हांशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १३ |
| सहामाही | ८ |
| साल अखेर | १८ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून आगाऊ वर्गणी याशी म्हणजे पत्र सुरूं केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | १६ |
| हीच नोटिस दुसरे खेपेस | १ |
| इंग्रजी लिपींत दर ओळीस | ४ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ३ |


*WONDERFUL SARSAPA-RILLA!*

This preparation containing all the medical properties of the valuable drug Sarsa, combined with some other useful ingredients, is *guaranteed* to cure obstinate skin diseases, syphilitic eruptions, constitutional syphilis, loss of appetite Nervous and General Debility, costiveness, venerial sores, and all other affections arising from the abuse of mercury.

*per bottle Rs 1 Packing As 4*
*Per doz Rs 11.*

Specifics for Spermatorrhœa Gonnorrhœa, Gleet, Syphilis, and mpotence. In bottles Rs. 2 and Rs. 4 Packing Ans. 4 *Cure guaranteed* In failure the money will be returned.

CURE FOR HYDROCELE.

*Guaranteed* to cure cases to long standing. Warranted to be free from mercury or other injurious drugs. In pots Rs. 2 and Rs. 4 Packing Ans. 4 Per doz. Rs. 21 and Rs. 40

W. Rooder and Coi
Surgeons Calcutta


नोटीस

मी. शेख रहिमान वल्लद शेख इमाम राहणार हतरुण तालुके बाळापूर जिल्हा अकोलें यांस नोटीस देणार आमनखा वल्लद इमामखा राहणार अकोलें याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आपल्याकडे कर्जाऊ रुपये ३४० व आजपर्यंतचें व्याज आणि ह्या नोटीसीचे खर्चासुद्धां एकंदर मिळून सर्व रक्कम ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत निकाल करून पावती घ्यावी. असें न केल्यास रीतीप्रमाणें कोर्टांत दावा करून सर्व रक्कम व त्याचें व्याज व खर्च वगैरे भरून घेतला जाईल कळावें तारीख १७।४।८४ इसवी.

(सही) आमनखा वल्लद इमामखा राहणार अकोलें.

नोटीस.

रामचंद्र लक्ष्मण शुक्ल हल्लीं वस्ती रामतीर्थ तालुके दर्यापूर यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, मौजे विरोड तालुके मूर्तिजापूर हा गांव आमचे जोशीपणाचे वृत्तीचा असून तुम्ही आमचे तर्फे गुमास्तीगिरीनें करण्याचे करारानें शके १८०४ चे कार्तिक मासांत घेऊन दरसाल स्वामित्वाबद्दल रुपये १५ हे रघुपत गणेश व दाजीपंत पारसकर यांचे समक्ष आम्हांस देण्याचे कबूल करून काम करूं लागला व त्याप्रमाणें गोपाळ सोनाजी अग्निहोत्री यांचे हातून शके १८०५ चे कार्तिकांत ९ रुपये व शके १८०५ चे पौषात ५॥। एकून १४॥। पाठविले ते पोहोंचले परंतु ठरलेले करारा प्रमाणें लेख आज तारखेपर्यंत लिहून दिला नाहीं. यास्तव तुम्हास ही नोटिस देण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्या दिवसापासून ४ दिवसाचे आंत लेख करून द्यावा. जर त्याप्रमाणें न कराल तर तुम्हास याहून वेळोवेळीं आमचीं पत्रें ३ तुमचेकडे गुमास्तगिरीनें आहेत तें सर्व पत्रें परत घेऊन तुम्ही लिहून दिलेल्या शर्तीनमाणें तुम्हास काढून दुसरा गुमास्ता ठेऊं. देऊं ह्या नोटिशीचा खर्च तुमचे पासून घेतला जाईल. कळावें. तारीख १।४।८४ इसवी.

सही राघव रघुनाथ जोशी विरोडकर यांजकडून कुलमुखत्यार अनंत रामशास्त्री घोंगे अकोलेंकर दस्तुर खुद.

जाहिरात.

सर्व लोकांस असें कळविण्यांत येतें कीं गंभिरमल राहणार बोरगांव मयत याणी मनश्या दत्तक घेतले असून सर्व तिनचे मालक करून दिले. हल्लीं माझी दत्तक आई मखु ही माझे तंटा करून आहे आणि असें समजतें कीं गंभिरमलचे दुकानचें जितके कर्जदार आहेत त्यांजपासून कर्ज वसूल करून पावती देत असते सबब सर्व लोकांस जाहिरातीनें असें प्रसिद्ध करण्यांत येतें कीं जे गंभिरमलचे दुकानचे कर्जदार आहेत त्यांनीं मखु मर्द गंभिरमल हिजला पैसा देऊं नये व तिजपासून पावती घेऊं नये. जर या नोटिसीप्रमाणें गंभिरमल याचे कर्जदार यांनीं अमल केला नाहीं तर गंभिरमलचा दत्तक पुत्र मी याजखेरीज तर वसूल करून मखु इजला दिलेला पैसा मजरा देणार नाहीं कळावें ता० १९ माहे एप्रील सन १८८४ इ०

सही.

शिवलाल गंभिरमल मारवाडी राहणार बोरगांव.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं खालीं लिहिलेल्या आगिचे विमा उतरण्याच्या कंपनीच्या तर्फे आम्हास एजंट नेमिलें आहे. आम्ही त्यांच्या तर्फे फार किफाईतवार दरानें आगीपासून घर, गिरण्या, इमारती, घरगतीसामान, माल आणि सर्वप्रकारचे व्यापाराचे जिन्नस यांचा विमा उतरण्यास तयार आहोत. ज्यास्त माहिती खालीं सही करणाराकडेस मागितली असतां मिळेल.

बाम्बे फायर इनशुरन्स कंपनी लिमिटेड ट्रान्स आटलांटिक फायर इनूशुरन्स कंपनी नार्थ जर्मन फायर इनूशुरन्स कंपनी ल्युबेक फायर इनूशुरन्स कंपनी समरांगसी आणि फायर इनूशुरन्स कंपनी बेटेव्हिआसी आणि फायर इनूशुरन्स कंपनी फायर इनूशुरन्स कंपनी इन्सुलिन.

आकोला ता० १६ एप्रिल सन १८८४ } ब्रुएल आणि कंपनी

*ADVERTISEMENT.*

We beg to inform the public that we have been appointed agents for the undermentioned Insurance Companies and that we are now prepared to accept on their behalf Insurances against Fire Upon Houses, Mills, and another *Buldings*, Household—furnitute, Goods, Wares are Merchandise at most favorable terms.

We will be glad to furnish full particulars on application.

*Bombay* Fire Insurance Company, Limited.

Transatlantic Fire Insurance Company.

North German Fire Insurance Company.

Lubeck Fire Insurance Company.

Samarang *Sea* and Fire Insurance Company.

Batavia Sea and Fire Insurance Company.

Fire Insurance Company Insulinbe.

Breul & Co.

Akola
16 April 1884.

वऱ्हाडसमाचार

तिथी चैत्र वद्य ११ शके १८०६

चांदा रेलवेच्या संबंधाची मूळापासूनची सर्व हकीकत नबाब सालरजंग मुखत्यार उलमुल्क यांचे सहीनिशीं प्रसिद्ध झाली आहे त्यावरून आतां उघड दिसतें कीं कलकत्याच्या स्टेटस्मन पत्रकर्त्याचे तत्संबंधाचे आक्षेप निष्फळ आहेत त्या पत्रकर्त्याचे हिंदुस्थान सरकारास मोठें आग्रहाचें सांगणें आहे कीं यांनीं ह्या भानगडीच्या प्रकरणाचा फार बारकाईनें शोध करावा व तसें करण्याची यांची इच्छा असल्यास हैदराबादच्या कौसिलचें त्यावेळचे प्रोसिडिंगाची प्रत त्याचे खात्री न करण्यास ते सिद्ध आहे, आता त्या प्रोसिडिंगाच्या खरें खोटेंपणा विषयीं अथवा ते स्टेटस्मन पत्रकर्त्याचे हातीं कसें आलें असावें याविषयीं विचार जरी आम्ही आज करीत नाहीं तरी ज्या अर्थी त्यांचे नबाब लियाकत अली सालरजंग यांजवर मि. आरनाईट यांचा पूर्ण विश्वास आहे त्याअर्थी त्यांचे सहीनिशी प्रसिद्ध झालेल्या लेखावरून ह्या रेलवेच्या संबंधाने झालेला त्यांचा ग्रह बदलेल असें वाटतें. सदरहू लेखावरून दिसून येतें कीं आदिपासून अखेर पावेतों या कामांत कांहींच गैरशिस्तपणा झाला नाहीं त्यांचेवेळच्या कौन्सिलामध्यें या बाबतींत कांहींच घोटाळा झाला नाहीं हे नबाब सालरजंग यांच्या स्वतःच्या लेखावरून स्पष्ट दिसून येईल. ते लिहितात कीं "जो हल्लीं निजामसरकारचा दिवाण आहे व पूर्वीं मी त्या कौन्सिलचा सेक्रेटरी व जॉईंट आडमिनिस्ट्रेटर होतो तेव्हां सन १८८३ मार्च ३० रोजीं ह्या प्रकरणाचा विचार (चांदारेलवेचा) करण्याविषयींची दाद मी कौन्सिलपुढें आणिली; व ह्या संबंधीं वाटाघाट कित्येक सभामध्यें झाल्यावर ह्या गोष्टीस नबाब बशिरुद्दवला बहादुर खेरीजकरून बाकी सर्व मेंबरांचें अनुमोदन मिळालें. हे मताचा दिवाण नबाब सर सालरजंग यांचे मताप्रमाणेंच पडलें व त्याप्रमाणें सरदारदिलरजंग यांस मार्टीन रोज आणि कंपनी यांनीं कबूल केलेल्या अटीप्रमाणें त्यांच्याशीं ठराव करण्याचा अधिकार दिला गेला जेव्हा मार्टीन रोज आणि कंपनीनें ह्या रेलवेसंबंधीं बोलणें करण्याचें अगदीं नाकारिलें तेव्हां सरदार दिलरजंग यांनीं आपण पुढें कसें काय वागावें याविषयीं तारेनें विचारल्यावरून त्यांना जो त्यावेळीं हुकूम झाला त्याचेच आधारें त्यांनीं इंग्लंडच्या न्याशनल प्रोव्हिन्शल ब्यांकेशीं बोलणें चालविलें व ह्या कामाकरितां एक नवीन कंपनी

काढण्याचें त्यांस सुचविलें. पुढें या गोष्टीस निझामसरकारचें अनुमोदन व हिंदुस्थानसरकारची मंजुरात घेऊन त्यांनीं निझामस्टेटरेल्वे कंपनी लिमिटेड या नांवाच्या नव्या कंपनीशीं ठराव केला." ह्या संबंधी ज्यास्त हकिकत आम्ही पुढील अंकीं देऊं.

## इंडियन सिव्हिलसर्व्हिस परीक्षेचीच्या वयाची मुदत.

ह्या परीक्षेस लागणाऱ्या वयाची मुदत वाढविण्याविषयींचा पत्रव्यवहार हिंदुस्थान सरकार व स्टेट सेक्रेटरी यांमध्यें चालूं होता त्याचा नुकताच नेटिवांस प्रतिकूळ असा निकाल झाल्याचें कळतें. दुसरें असें समजण्यांत आलें आहे कीं ही वयासंबंधी मुदत वाढविण्याविषयीं हिंदुस्थान सरकाराकडून शिफारस करण्यांत आली नव्हती. यावरून हिंदुस्थान सरकारचें मत इंडिया आफिसच्या मताप्रमाणेंच आहे म्हणून स्टेट सेक्रेटरी यांनीं वया मध्यें फेरफार करण्याचें नाकारलें. आतां हिंदुस्थान सरकाराकडून म्हणजे लार्डरिपन सारख्या नेटिव लोकांच्या कनवाळू गृहस्थाकडून या बाबतींत शिफारस झाली नसेल ही गोष्ट अगदीं विश्वसनीय दिसत नाहीं. लार्डरिपन साहेब हिंदुस्थानांत आल्या दिवसापासून त्यांनीं नेटिवांच्या फायद्याच्या ज्या गोष्टी केल्या आहेत व करीत आहेत त्यांवरून तर ही गोष्ट बिलकुल संभवत नाहीं. परंतु वास्तविक कशी हकीकत झाली असेल हें सांगवत नाहीं. त्यांनींही कोणतीही गोष्ट करण्यास आपल्या कौन्सिलाचें पाठबळ पाहिजे व त्यांनीं केलेली शिफारस स्टेटसेक्रेटरीस मंजूर पडण्यास लोकबळ ही पाहिजे म्हणून त्यांचे मनांत देशाचें कितीही कल्याण करण्याचें आलें तरी त्यास वर सांगितलेलें साधीदार अनुकूळ नसले तर त्यांचा काय उपाय चालणार. असो. आतां लार्ड किंबरले यांचा जरी या बाबतींत आपणांस प्रतिकूळ असा ठराव झाला आहे तरी तो कायमचा किंवा अखेरचा आहे असें नाहीं. आपण जर उगीच बसलों तर कांहीं एक होणें नाहीं. प्रथमतः लार्डरिपन पावेतों व नंतर लार्ड किंबरले पावेतों आपली दाद लागेल असें केलें पाहिजे म्हणजे ह्या गोष्टीचा विचार पुन्हा हिंदुस्थान सरकारच्या कौन्सिलांत होऊन लार्ड किंबरले पावेतों लिहून जाऊन ते ही ह्या महत्वाच्या गोष्टीचा पुनरपि विचार करतील व नेटिवांचे सुखदुःख मनांत आणून आपला पूर्वीचा ठराव बदलतील.

सिव्हिलसर्व्हिसची परीक्षा विलायतेंत होत असून तिजकरितां जाण्याची हिंदुस्थानांतून नेटिवांस परवानगी आहे. यावरून नेटिवांस मोठ्या हुद्याच्या जागा मिळूं नयेत किंवा राज्यव्यवस्थेंत त्यांचें अंग असूं नये असें ब्रिटिश सरकारचें मत असेल असा कुतर्क कदापिही कोणास घेतां येणार नाहीं. परंतु त्या परीक्षेस वयाची जी अट आहे ती फारच कडक असल्यामुळें इकडच्या उमेदवारांस ह्या परीक्षेस जाण्याची परवानगी असून नसल्या सारिखें झालें आहे. आजवर हिंदुस्थानांत नेटिवांत असे विद्वान झाले आहेत कीं त्यांच्या विद्वत्तेस विलायतेंतील मोठ मोठ्या युनिव्हर्सिटीच्या प्रोफेसरांनीं माना डोलविल्या आहेत. ब्रिटिश सरकारास असें पूर्णपणें समजून आलें आहे कीं नेटिव लोक कोणतेंही जबाबदारीचें काम करण्यास अगदीं लायक आहेत. हिंदुस्थानांत ज्या परीक्षा आहेत त्यांत अनेक लोक दरसाल पसार होत आहेत व त्या परीक्षेच्या यत्ता ह्यापेक्षां जरी अधिक वाढविल्या तरी ते त्यांस हार जावयाचे नाहींत. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा जरी दूरच्या देशांत आहे व तिची वयाची मुदत जरी फार थोडी आहे तरी तींत देखील कित्येक तरुण नेटिवांनीं आपलें नांव गाजविलें आहे. ती परीक्षा जर हिंदुस्थानांत असती तर मग ही वयाची नड जरी असती तरी इतर परीक्षे प्रमाणेंच बरेच उमेदवार ह्या परीक्षेंत पास झाले असते व वयाची नड नसती तर मग त्यापेक्षांही पास होणारांची संख्या अधिक वाढली असती. आतां विलायतेंत परीक्षेस जाण्यास एक तर खर्च फार लागतो. दुसरें वय तेव्हांच भरून जातें ह्या योगानें पुष्कळ तरुण नेटिवांचें बुद्धिचापल्य व्यर्थ जातें. आतां ती परीक्षा हिंदुस्थानांत व्हावी असा बदलचें जरी आज आग्रह पूर्वक आमचें म्हणणें नाहीं तरी तूर्त आम्ही एवढेंच इच्छितों कीं ह्या परीक्षेच्या वयाची मुदत वाढविण्या विषयीं हिंदुस्थान सरकारानें व स्टेट सेक्रेटरी यांनीं पुन्हा विचार करावा. व त्यांनीं तसें करावें या साठीं आपण मोठ मोठ्या जाहिर सभा भरवून त्यांत ह्या विषयाचें प्रतिपादन करून ह्या गोष्टीची दाद लागावी या करितां अर्ज केले पाहिजेत. तसेंच प्रत्येक सभे कडून व मंडळीकडूनही अर्ज गेले पाहिजेत कारण लार्डरिपन यांचे मनांत ही गोष्ट करण्याचें कितीही असलें तरी लोकांचें बळ असल्या शिवाय त्यांस या कामांत हात घालतां येणार नाहीं. जरी लार्ड किंबरले यांस हाउस आफ् कामन्सचें व म्हणणें बहुधा मान्य करावें लागेल तथापि लार्ड रिपन यांस आपल्या कौन्सिलाचें व लोकमताचें साह्य असलें तर ते लार्ड किंबरले यांस आपल्या मतास अनुकूल करून घेतील यांत संशय नाहीं. या विषयींची जर आतांच आपण उचल न घेतली तर तो तसाच मागें पडेल व लार्ड रिपन सारखे नेटिवांचे पुरस्कर्ते व्हाइसराय आपणास पुढें कधीं मिळतील व याबाबतींत आपणा करितां कधीं भांडतील हें सांगवत नाहीं. याकरितां आमचे देश हितेच्छु लोक ही संधी दवडणार नाहींत अशी आशा आहे. हें प्रकरण पुन्हा एकदां पायरी पायरीनें लार्ड किंबरले यांजपावेतों गेल्यास ते ही आपलें मत प्रतिकूल देतील असें वाटत नाहीं कारण वयाची गोष्ट मनुष्याच्या स्वाधीन नाहीं. हिंदु लोकांकरितां ती परीक्षा अधिक कठीण केली तर एक वेळ चालेल पण वयाच्या संबंधानें इतका कडक प्रतिबंध नको. वेळेवर कोणाचा दाव नाहीं व कांहीं एक हरकतीमुळें ते नेमलेल्या वयांत कोणा एकास परीक्षेस जातां न आलें तर त्याच्या पुढील आशा सर्व थैव भंग होतात. तरी ह्या बाबतींत आमचे बंधू लक्ष्य देतील ही पूर्ण आशा बाळगून हा विषय आम्ही पुरा करितों.

The Berar Samachar

MONDAY, april, 21, 1884

### *ANOTHER FAREWELL MEETING.*

Now a days the practice of entertaining an out-going and popular Government high official of a long standing, to a public Pansupari, seems to be very much on the increase, and this mania does not appear to have spared our students even. It was only in January last that the pupils of the Akola high school had a meeting in honor of Rao Bahadur Narayan Bhai Dandekar the late Director of Public Instruction, and another during the last month in honor of their Head master Mr G. C. Aitken. On sunday the 13th intsant, they held a third one in their own school-house to bid good-bye to their respected master Mr Raghunath Balkrishna Talvalkar the head assistant, who had equally the charge of matriculation class here as the Head master, and who is now transferred on prmotion to Amraoti to conduct the High school there.

There was a good concourse of native gentlemen assembled, among whom we noticed the officiating Director, Mr Mahajani, the Deputy Educational Inspector of the District, the Vice—President of the Municipality, Mr Dattopant V. Bhagvat, the Principal of the Training College, the Head master of the Anglo-vernacular school, Mr Sadashive Rao Bhagvat and many others. On Mr Deorao Vinayak's being voted to the chair, he atonce commenced the business of the morning by a short speech in Marathi, after which three speeches were made by three students of the school, one in Marathi prose, another in Marathi verse and the third in Urdu in each of which they appropriately dwelt at length on Mr Raghunathrao's great familiarity with his pupils, the interest he took in their welfare, the great solicitude and care which was shown by him, on their account, his quiet disposition, and above all the effective way in which he taught his pupils without ever getting angry or feeling disposed to make use of cane.

These speeches of which the first one was extempore, were followed by a fourth one from Mr S. V. Bhagvat, when Mr Raghunathrao stood up to say a few words in reply to the gentlemen and students who had only a short time before spoken in praise of him. He was really over powered with grief at the coming separation from his pupils and spoke very feelingly assuring each of them that he would never forget their connection with him or be ever slack in giving them his advice whenever they would want it. He thanked the students and the gentlemen assembled for the courtesy shown by them to him and for the honor they had done by their presence, after which he sat down. Then Pansupari garlands, flowers, attar, gulab, & were distributed to all the company assembled, when the President spoke in regard to the proceedings of the morning and declared the meeting to be dissolved.

The Residency:—Colonel Sir Oliver St John is arrived at Hyderabad by mail train last Tuesday evening. A Guard of honor was drawn up on the platform and a salute of 13 guns was fired from the battery on the Red hills and a similar salute from the saluting Battery at the mud fort. He was received at the station by the Prime Minister and his brother Nabab Muniar-ool-Moolk, Nabab Busheer-ood-dowlah, the whole of the Offieers of the Residency, Major Peville Messers. Wilkinson and G. Palmer, a few Officers of the H. S. force and several native gentlemen.

The opening ceremony of the new Library building in front of the Charitable Dispensary took place this morning. Colonel Fitzgerald our popular and energetic Deputy Commissioner presided. The ceremony was grand and was cordially attended by a large number of citizens. We are compelled to defer the proceedings of the meeting to our next issue for want of space.

Colonel Bell the judicial commissioner went to Chikaldara on the 18th instant. He will hold his court there during the hot season.

Mr Wasudev Sadashiv having returned from his Talukedarship in the Nizam's dominions proceeded to Chikhalda to join his acting appointmdnt as Clerk of court to the judicial commissioner during the absence of Mr Bhaskar Sakharam on six months' provilege leave.

The news regarding the temporary transfer of Mr Purshottam Narayan Bhat to the Small cause court Amaraoti has been contradicted. We learn from a sure hand that he is to take chage of the Small cause court here and Mr Nicholetts will go to Amaraoti' to relieve Mr Grant who has been appointed to officiate for Major Bullock during his absence on three months' previlege leave.

Mr Keshava Mahipat Kharkar has taken one year's leave to go to his native place to recruit his health as he has been ailing for the last few months.

The libel case:—the Judgment in the case of John Seymour Keay versus the Deccan Times which was to be delivered on the 17th instant, was postponed to Saturday last.

H H the Nizam:—His Highness the Nizam, attended by some of his nobles left Hyderabad on the 13th instant for Gungawaram on a shooting excursion H. Higness and suite returned to Hyderabad by train the next day evening.

On travel:—Nabab Shumsool Oomrah Ameer-i-Kabeer, Korshed Jah, after the embarkation of his son on board the Malwa on the 11th instant left Bombay for AJmeer on a tour through Northern India and is expected to be absent some months. His eldest son also who went to see his brother off, has left or will leave Bombay shortly, on a visit to the celebrated places in Hindustan.

H. H. The Nizam's Police:— We hear that colonel Ludlow has been appointed Inspector General of Police, and is to have entire control of the Police administration of these Dominions

The gallant Colonel's zeal energy and ability are well known and the Nizam's Government could not possibly have made a better selection for the new post it has created. Colonel Ludlow is to have two Assistants, but it is not yet known who will be appointed. Very likely he will be allowed to choose his own men, and if he is, it is very sure that he will make good selection.

*Appointment*:—Nawab Mooner-ul-Mulk, the youngest son of the late Sir Salar Jung has been appointed Assistant to the Minister in the Military Departments.

The Indian Mirror publishes the following special telegram from London:—"A crowded and enthusiastic public meeting was held at the Kensington Town hall, London, in connection with the Ilbert Bill compromise. The meeting was addressed by Mr Firth, M. P. Mr Lalmohun Ghose, and several others. Resolution expressing the regret meeting at the compromise, and urging the extention of trial by jury and the separation of judicial and the executive functions in the Indian Magistracy, were unanimously carried. The name of Mr Rivers Thomson was received by the audience with hisses."

## वऱ्हाड.

आलिशान रेसिडेन्ट कर्नल आलिव्हर सेंट जान साहेब हे गेल्या मंगळवारीं मेल ट्रेननें हैदराबादेस येऊन दाखल झाले. स्टेशन प्लाटफार्मवर ते आल्याबरोबर तेरा तोफांची सलामी झाली. दिवाण साहेब, आणि बंधु नबाब मुनिर उलमुल्क, नबाब बुशिर उद्दवला व रेसिडेन्सी कचेरींतील सर्व कामगार लोक मेजर नेव्हिल्ली, पामर साहेब इ. बरीच मंडळी त्यांच्या सन्मानार्थ जमली होती.

निजाम सरकार कांहीं सरदार मंडळी बरोबर घेऊन गेल्या १३ व्या तारखेस शिकारी करितां गंगावरम येथें गेले होते ते दुसरे दिवशीं संध्याकाळीं मंडळीसह हैदराबादेस परत आले.

जान सीमोरकी आणि डेक्कन टाईम्स यांचा जो मोठा मायबलचा खटला चालला आहे त्याचा निकाल गेल्या शनवारीं होणार होता.

येथील नेटिव जनरल लायब्ररीचा गृहप्रवेश समारंभ चारिटेबल डिसपेन्सरीच्या समोर आज सकाळीं सात वाजतां झाला. मेहरबान कर्नल फिट्झगरल्ड साहेब यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. समारंभ टोलेजंग थाटावर झाला. लोक समाज बराच मोठा जमला होता. या समारंभाची सर्व हकीकत आह्मी पुढील अंकीं देऊं.

कर्नल बेल साहेब जुडिशिअल कमिशनर हे ता० १८ शुक्रवार रोजीं चिखलदऱ्यास गेले.

रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर यांचीं रा. रा. भास्कर सखाराम जुडिशिअल कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट यांच्यासह महिन्यांच्या रजेवर (?) नेमणूक झाल्या ... रुजू होण्या

Fire ... ing ... English. He

करितां गल्या शनवारीं चिखलदऱ्याकडे रवाना झाले.

गेल्या अंकीं रा. रा. पुरुषोत्तम नारायण भट यांची उमरावतीस बदली होणार असल्याचें लिहिलें होतें. तसें कांहीं न होतां उमरावतीस मि. ग्रान्ट साहेब यांच्या जागीं मि. निकालेट हे जाणार व त्यांचे येथील स्मालकाज कोर्टाचें काम रा. रा. पुरुषोत्तम नारायण हे पाहणार असल्याचें कळतें.

गेल्या सोमवारीं व मंगळवारीं वऱ्हाडांतील सर्व व्हालंटीअर लोकांची उमरावतीत कवायत झाली. इलिचपूरच्या पलटणींतील बांड वगैरे आला होता.

एथील हायस्कूलांतील फर्स्ट असिस्टंटच्या रिकाम्या जागेवर मुंबईकडील ग्राज्युएट रा. रा. गोपाळ रामचंद्र पिटके यांची नेमणूक होणार असल्याचें कळतें. वऱ्हाडांतल्या वऱ्हाडांत त्या जागेचें काम चालविण्या लायक अशा एखाद्या गृहस्थास न नेमितां अशी व्यवस्था बाहेरून कां केली हें समजत नाहीं.

रा. रा. आत्माराम अनंत हे इलिचपूरहून आपल्या पूर्वीच्या जागेवर यवतमाळास जाण्याकरितां गेल्या सोमवारीं रवाना झाले.

रा. रा. केशव महिपत खारकर हे आजारी असल्यामुळें एक वर्षाच्या रजेवर औषधोपचाराकरितां देशीं जात असल्याचें कळतें.

रा. रा. लक्ष्मण गोविंद ऋषी यांनीं आणखी एक महिन्याची रजा वाढविली तेव्हां यांचें काम रा. रा. पुरुषोत्तम गणेश हेच पाहतील.

सृष्टिक्रमाविरुद्ध घडलेला इलिचपूर येथील खुनी मोकद्दमा इतके दिवस चालला होता. त्यांतील आरोपी खुनाच्या चार्जांतून मुक्त झाले. व त्यांतील एकाला सृष्टीविरुद्ध केलेल्या संभोगा बद्दल दोन वर्षांची सजा झाली होती ती कायम झाली.

'सरिता वेष्टित द्वीपी वासकर्ता' आपला पत्रव्यवहार पोंचला. त्यांतील 'वार्तारूपी सुंदर दयिता' धुंडतां धुंडतां कोठेंच सपडला नाहीं व लिहिण्याचा उद्देश ही कळला नाहीं. आपण 'तर्करहित झाल्यामुळें मर्क' झाला आहां तर थोडेसे सावध झाल्यावर लिहावें.

'एक शंकित विद्यार्थी' या सहीचा नागपूराहून एक पत्रव्यवहार आला आहे. फार उशीरा आल्यामुळें त्याचा विचार पुढील अंकीं होईल.

दहिहंडा तारीख १७-४-८४.

( लिहून आलेला मजकूर )

हवामान— ऊन फार तापतें त्यामुळें उष्मा अगदीं विलक्षण होतो. गांवांत कांजण्याची सांथ आली आहे. बाजारभाव साधारण आहेत. गुदस्त सालीं पाऊस फार झाला त्यामुळें यंदा पाण्याची रेलचेल आहे. ह्या सालीं पाण्याचे एक लोकांनां विशेष सुख आहे.

लोकलफंड केमेटी— या गांवीं हीं कमिटी पुष्कळ दिवसांपासून आहे. ती बहुतेक वर्षभर झोंप घेते व साल अखेरचे दिवस आले ह्मणजे जागी होते. जो पैसा सरकारांतून खर्च करण्या करितां मिळतो तो खर्च होत नाहीं. एकंदरीनें सर्व वर्षांत एक दोन कामें झालीं ह्मणजे आपलें काम झालें असें तीस वाटतें. बरें, जीं कामें होतात तीं ही वेंधळेपणाचीं. त्यांस ताळा ना तंत्र. जेथें चुन्याचें काम पाहिजे तेथें मातीचें, मातीचें तेथें चुन्याचें ही कामाची व्यवस्था व टापटीप. या पासून लोकांना मात्र त्रास सोसावा लागतो. गांव सफाई विषयीं तर आंधार आहे. रस्त्यावर केर कचरा पडलेला असताच, त्याची कमिटीच्या अंगाला ही तितकीच काळजी. तशांत घरांतील मोऱ्यांचें पाणी सडकेवर वाहत असतें. इतर लोकांविषयीं घटकाभर असूंद्या पण प्रत्यक्ष कमिटीतील गृहस्थांच्या घरांपुढें ही ही व्यवस्था आढळते. त्यांस बोलणार कोण व जुमानतो तरी कोण? अशी अव्यवस्था असल्यामुळें कमिटीचा तादृश उपयोग होत नाहीं. या कमिटीस चांगलें वळणावर आणणारा मिळेल तर चांगलें सुखावह होईल.

स्कूल कमिटी— या कमिटींत श्रीमान व सुखवस्तु लोक असणें हें इष्ट होय. पण नामधारी मेंबर असण्यापेक्षां दुसरे साधारणच लोक असले तरी बरें होईल. मेंबर लोक कधीं शाळेची विचारपूस ही करित नाहींत. शिवाय ज्यांनां कांहीं लिहितां वाचतां येतें असे मेंबर पाहिजेत. तसें नसल्यामुळें शाळा सुधरावी तशी सुधरत नाहीं. येथील हेडमास्तर आपल्या कामांत दक्ष असतात. शिवाय पोलिस पाटिलांचें लक्ष चांगलें आहे. ते मधून मधून शाळा पाहात असतात. परवा त्यांनीं शाळेला घांट नव्हती ह्मणून एक घांट बक्षीस दिली.

पोस्ट आफिस— इतके दिवस ज्या ठिकाणीं हें आफीस होतें ते ठिकाण वस्तीच्या अगदीं एकीकडे होतें. शिवाय ती जागा मोडकळीस आली होती ह्मणून पोलिस पाटील रा. रा. मारुती हणमंत यांनीं स्वतः नड सोसून बाजारांतील भरवस्तीची आपली जागा पोस्ट आफिसाकरितां दिली. तेथें कांहीं गोष्टीची अडचण आहे ती दूर झाली ह्मणजे पोस्ट आफिसाचें काम सुरळीत चालेल.

संस्थान— एथें एक बालाजीचें संस्थान आहे. सरकारांतून देवप्रीत्यर्थ पूजाऱ्यास सालिना दोन हजार रुपये मिळतात. त्या रुपयांची कशी विल्हेवाट होते व संस्थान कसें चाललें आहे हें पुढील खेपेस लिहीन.

पोलिस स्टेशन, सब रजिस्टरचें आफिस, व लायब्ररी या संबंधानें पुष्कळ गोष्टी कळवावयाच्या आहेत त्या सवडीनुसार कळवीन.

## पाहिजे.

आह्मांस अकोलें येथें नवीन छापखाना घालावयाचा आहे; त्याकरितां एक प्रेसमन, एक बाइंडर, व मराठी व इंग्रजी कंपाझिटर्स लागतील. काम ज्यांस माहित आहे त्यांस आह्मी लागलीच नोकरी देऊं; ज्यांस काम शिकावयाचें आहे त्यांस तें शिकवून मग चाकरीस ठेवण्यांत येईल. कोणास समक्ष भेटण्याचें असेल त्यांनीं रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत वकील यांचे घरीं यावें. नोकरी करूं इच्छिणारांनीं आपले अर्ज कोणी तरी संभावित गृहस्थाच्या सर्टिफिकिटासह सदरहू वकीलांचे पत्त्यावर आह्माकडे पाठवावे. अर्ज तारीख ५ मेच्या आंत आले पाहिजेत. अकोलें तारीख २० एप्रिल सन १८८४

व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर.

(मागाहून आलेली)

नोटीस

रा. नवगाजी कुणबी राहणार मांडोली तालुके बाळापूर यांस नोटीस देणार एडूजी वल्लद आसाजी पाटील राहणार मांडोली नोटीस देतों अशी कीं मजला कांहीं घरच्या कामाकरितां रुपयेची जरूरी होती ह्मणून तुजला मी रुपये १०० चा दस्त ऐवज लिहून दिला व त्याजबदलचे रुपये आज देऊं उद्यां देऊं ह्मणून आज चार महिने विनाकारण चाळवण्या दाखवित आहेस याज करितां तुमला ही नोटीस देऊन कळविलें जाते कीं आमचे रुपये १०० चा दस्तऐवज तूजपाशीं पोकळ आहे मजला रुपये मिळाले नाहींत पुढे मागें तूं मजवर रुपये बद्दल कोर्टांत फिर्याद करशील तर मीं कांहीं तुझे देणें नाहीं कळावें.

(सही) एडुजी वल्लद आसाजी पाटील राहणार मांडोली.

नोटीस.

रा. रा. खंडुजी वल्लद माहदु कुणबी राहणार दहिगांव तालुके अकोट यांस नोटीस देणार राजाई मर्द खंडुजी नोटीस देते अशी कीं तुझ्याशी माझें लग्न होऊन सुमारें १२ बारा वर्षें झालीं. चांगल्या रीतानें मजला वागविली। पुढें दोन मुलें बाळें ही झालीं. असें असून आज दोन वर्षांपूर्वीं घरांतील मनुष्याचें व माझें पटेना त्यावेळीं तुजला मी सांगितलें कीं मजला निराळें घर करून दे निराळी राहते तूं सांगितलेंस कीं, मी निराळी जागा देत नाहीं पुढें मी पंधरा दिवस जेवण खाण वगैरे सोनारच्या घरीं करीत होते. परंतु तूं मजला निराळें न ठेवितां मजला सांगितलें कीं, मजला तुझी जरूर नाहीं नंतर मी आपल्या बापाचे घरीं आज दोन वर्षें जाऊन राहिले माझ्या बापानें दोन वेळ तुजकडे येऊन विचारिलें परंतु सांगितलें कीं मजला जरूर नाहीं ह्मणून वगैरे कारणामुळें तुजला ही नोटीस देऊन असें कळविलें जाते कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत घेऊन जावें नाहीं तर सोडचिठी द्यावी आणि मजवरील तुझा हक्क सोडून द्यावा. व आज दोन वर्षांची पोटगी व ह्या नोटीशीचा खर्च व लग्नाचे रुपये असे मिळून सर्व रक्कम तुजवर दावा करून भरून घेतली जाईल. व माझ्यावर तुझा कोणचेही प्रकारचा हक्क राहणार नाहीं कळावें. ता० १८-४-८४ इ०.

सही.

राजाई मर्द खंडुजी हिच्या हातची निशाणी (?) बांगडी.

## वर्तमानसार.

डा. सरकार यांच्या सायन्स असोसिएशनच्या फंडास लार्ड रिपन यांनीं दोन हजार रु० बक्षीस दिले.

अमेरिकेंतील "बोस्टन आर्ट क्लब" नावाच्या मंडळीपुढें एक अशी सूचना सादर झाली होती कीं या मंडळीच्या कर्मणुकीसाठीं एक दारू पिण्याची खोली असावी. या सूचनेविषयीं सभासदाचे अभिप्राय कळण्यासाठी कित्येक महिनेपर्यंत ती सभासदात फिरून शेवटीं तिला ९८ मतें अनुकूल व १६३ मतें विरुद्ध पडल्यावरून ती सूचना अमान्य झाली. आमच्या देशांतील तरुण चैनी मंडळी इकडे लक्ष देईल काय आणि बाटलदेवीच्या आराधनेचा निंद्य प्रकार बंद करतील काय?

सर्व पृथ्वीवर बौद्धधर्मानुयायी लोकांची संख्या ४७ कोटी आहे असें एडविन आर्नोल्ड यांनीं आपल्या "लाइट आफ एशिया" नावाच्या पुस्तकांत लिहिलें आहे. परंतु ही संख्या फार चुकली आहे; कारण त्यांनीं चिनांतील सर्व लोक त्यांत गणले होत. परंतु चिनी लोक बुद्धाचे अनुयायी नसून कान्फुशि असेच आहेत असें प्रांघाय येथील डा. हापर यांचे ह्मणणें आहे. ते ह्मणतात कीं चिनांत २ कोटी, जपानांत १ कोटी ८० लक्ष, आणि माचूरिया येथें १ कोटी बौद्ध लोक आहेत आणि सर्व एशियाखंडांत एकंदर ७ कोटी २० लक्ष आहेत.

सन १८९६ साली इंग्लंड व वेल्स या दोन प्रांतांत तरुण मुला पैकीं अपराध्यांची संख्या १३,९८१ होती. यांत मुलगे ११-८०८ व मुली २,१७३ होत्या आणि सन १८८१ सालीं लोकवस्ती पुष्कळ वाढली असूनही एकंदर संख्या ९,४८३ होती. यांत मुलगे ८,६८८ आणि मुली ७९९ होत्या. यावरून अपराधाचें मान तिकडे कमी होत चाललें आहे असें ह्मटलें पाहिजे.

बंगाल इलाख्यांत विद्यार्थी लोकांवर फार कडी नजर होत चालली आहे. विद्यार्थ्यांस छड्या मारण्याचा प्रकार त्यांच्या सुधारणार्थ वहुतमानें सुरू झाला आहे.

दुर्भिक्षाचे महाराज यांनीं रिपन प्रांकत फंडाकरितां दहा हजार रु० दिले असें समजतें.

बंगाल इलाख्यात एकंदर १,२८,१३६ ख्रिस्ती लोकांची वस्ती आहे असें समजतें.

लार्ड रिपन साहेब पुढच्या वर्षीं मार्च महिन्यांत विलायतेस जातील असें ह्मणतात.

मांडले हें शहर आगीनें सुमारें निम्में जळालें असें सिमल्याच्या तारेवरून कळतें.

आलिकडे रेलवेचा मार्ग हिंदुस्थानांत कसा फैलावत चालचो आहे हें पुढील हकीकतीवरून समजेल. सन १८७३ सालअखेर तीन वर्षांत २०७ मैल रस्ता सुरू झाला; सन १८७४ त ३८३ मैल; १८७६ त ३७९ मैल; १८७७ त. ३९६, १८७८ त ५६४; १८७९ त ९९३; १८८० त ६६२; १८८१ त ९६०; व १८८२ त ५९१ मैल यापमाणें रेलवे मार्गाची वृद्धि होत आली.

कांहीं दिवसापूर्वी तीन तोळ्यांवरील वजनाच्या वर्तमानपत्राचें डाक हशील अर्ध्या आण्यापेक्षां कमी होईल असें चाललेल्या उद्योगाविरूद्ध व वाटाघाटीविरूद्ध वाटलें होतें; परंतु हिंदुस्थानसरकारानें एक लक्ष रु० नुकसानी होईल सबब तूर्त तसें करवत नाहीं असें कळविलें. पेट्रियटकर्ते ह्मणतात ज्या सरकारास मांचेस्टरच्या मन रंजनाकरितां तीन कोटीच्या उत्पन्नाचें नुकसान करवतें त्या सरकारास ज्ञानप्रसारार्थ एक लक्षाचें नुकसान सोसवत नाहीं. काय हा चमत्कार!

स्तुत्य औदार्य—कलकत्त्यांतील दोघी ब्राह्मधर्मानुयायी स्त्रियांनीं तेथील मेडिकल कालेजांतील दवाखान्यांतील रोग्यासाठीं ६० शेर वर्फ, ९० कलिंगडें आणि तऱ्हेतऱ्हेची दुसरीं पुष्कळ फळें पठविलीं आणि दुसऱ्या एका स्त्रीनें ९० पंखे आपल्या हातानें मढवलेले पाठविले. निराश्रित रोग्यांच्या स्वप्नांतही न येणारे पदार्थ यांस कडक उन्हाळ्यात प्रयक्ष उपभोगावयास मिळाल्यानें किती आनंद झाला असेल व त्यांनीं आपल्या दात्यांस किती आशीर्वाद दिले असतील हें सांगणें नको.

कलकत्त्यांत कपडे धुण्यासाठीं वाफेचा कारखाना घालण्याचें ठरून यंत्रें अमेरिकेहून तीन महिन्यांच्या आंत येऊन चालू होतील असें समजतें. सु प.

द्रव्य लोभ—वेंगुर्ल्यास एका गांवठी मास्तरानें दागिने काढून घ्यावयाच्या हेतूनें एका मुलाला आपल्या घरीं बोलाविलें. व त्याचे एक सोन्याचे कडें काढून घेतलें. पुढें माजिस्ट्रेटाच्या समोर खटला उभा राहून लबाड मास्तराला दोन महिन्याची सक्त मजुरी झाली.

पंढरीस चैत्राच्या वारीस अजमासें २०।२९ हजार यात्रा जमली होती.

चांचणी पाहून गेले—आनर हार नांवाचे आस्ट्रिया सरकारचे मुत्सद्दी कन्याकुमारी पासून तो तहत पेशावर पर्यंत हा सारा देश, यांतील व्यवस्था वगैरे सर्व टेहळून गेले. त्याचा मानमरातब आल्या सरकारानें जिकडे तिकडे उत्तम प्रकारचा ठेविला होता त्यांनीं असें बोलून दाखविलें कीं, एवढेसे इंग्रज लोक इतक्या कोटी माणसांवर आपला अमल चालवितात तरी कसे? अहो यांत नवल तें काय? इंग्रजी तंत्रच असें आहे. उद्यां जर ... हात पडला तर उमजून येईल.

सृष्टिवैचित्र्य—एका महाराचे घरीं कोंबडीचें अंड्यांतून एक वचा जन्मास आला. त्याचे सर्व अवयव मुंगी प्रमाणें असून पाय मात्र चार आहेत हें पिलूं चार दिवस जिवंत राहिलें असून अद्याप जिवंत आहे! त्याला चार पाय असल्यानें तें इकडे तिकडे ... .

बुकांवर कमाई—मिस्टर ... यांनीं आपल्या बापावर २ लाख ३० हजार रुपये मिळविले. आमच्या लोकांस पुरा द्वेष करणारे मेकॉले यांनीं २ लाख रुपयांची पुंजी केली. फ्रांसचे थियर्स यांनी ही दोन लाखांची कमाई केली. सर वाल्टर स्काट यांनी नुसत्या कांहीं "नावेल्स" वरच ११ लाख रुपये पटकाविले! राणीसाहेबांचे जनानखान्याला १००० रुपये आले होते! आमच्या इकडे ही बुकाच्या फायद्यावरी घातलेले रा० ब० लोकहितवादी व रा० विनायक कोंडदेव ओक यांना इंग्रजांचा स्तुतिपाठ गाऊन ही काय वरकत आली असल ती असो वाकी कविराय मोरोपंत यांना एकट्या घरपट्टादि सुपदं करून भारतासारखे नगरूपाळ ग्रंथ ठकलले असते हो साहिना तारी पांचशें रुपये नेमणूक होतो! नाहीं ना नवरात्रा फंडानीं व जोशीबुवांनां मराठी राज्याचा अखेरीस बराच पैसा मरळ खरा. वा० ह०

टांकसाळ—गेल्या आठवड्यांत मुंबईत टांकसाळेत १०,०७,२८९ रुपयांची चांदी शिलक होती, यांत आणखी २१,००,०७५ रुपयांची चांदी आली. पैकीं ४,२२,०२२ रुपयांचें नाणें पाडून दिलें, व बाकीं ६३,६४,१३८ रुपयांची शिल्लक आहे या शिवाय ६९,३२,८०९ रुपयांची खासगी व्यापाऱ्याची चांदी परीक्षेकरितां येऊन पडलीच आहे.

खजिना—इसवी सन १८८४,८५ सालाबद्दल १६,९०,००,००० रुपये हिंदुस्थानांतून रवाना व्हावयाचे. पैकीं ता० १ ली एप्रिल १८८४ पासून तो ९ वी एप्रिल १८८४ पर्यंत १३,६२,००० रुपये रवाना झाले आहेत. व आतां ३१ मार्च १८८५ पर्यंत १६५६,३८,००० रुपये इतके पाठवावयाचे राहिले आहेत.

चांदी व नाणें.—इसवी सन १८८३, ८४ सालांत गेल्या फेब्रुवारी महिन्याच्या अखेर कलकत्ता आणि मुंबई येथील टांकसाळेत अनुक्रमें १,०९,१२,२८९ व २,१७,९१,२८९ रुपयांची चांदी आली; पैकीं १,१४,६७,०९९ आणि २,१२,३९,४६४ रुपयांचें नाणें पाडून दिलें.

अट्टल चोर- हिंदुपंच तारीख ...... जबूर आहे.—नव्या पेठेंत परवां शनिवारीं एका गृहस्थाचे घरीं एक अट्टल चोर शिरून तो टमाडीवर गेला बंगला उघडाच होता. व गृहस्थ खालीं स्वयंपाक घरांत आपल्या बायकोशीं गप्पा गोष्टी करीत संध्याकाळच्या वेळीं भाकरीतून येऊन तुकतात बसला होता. चोरानें बंगल्यांतील बिछाना खालची सतरंजी, जाजम आणि हंतरी ह्मणजे चटईसुद्धां एकत्र बळकटी करून तसेंच एका खुंटीवर एक रात्री लोंबत होती ती घेऊन, या दोरानें तो बिछान्याचा गठ्ठा बांधला आवळून बांधिला. आणि उचलून डोक्यावर घेऊन गेला. बाहेरील तो नीट जिना उतरून खालीं आला. तों कोठाकडे कोणी राहणे भाग लागून या ... डोक्यावरचा गठ्ठा मनुष्यि नाहीं पडला. या आलेला बरोबर आतील गृहस्थानें 'कोण आहे?' ह्मणून विचारिलें. चोरानें न घाबरता व न, गडबडतां उत्तर दिलें.— महाराज मी आपला बिछान्याचा गठ्ठा.' गृहस्थानें विचारलें ' बिछान्याचा गठ्ठा ! कोठून आणिलात ?' ' तेव्हां आतां आपण लढ्ढा इथल्याच गृहस्थांनीं दिला यांत घेतला ' असें तो; चोर ह्मणाला; लिलांवात घेतला ? विछाना कोणी, मीं ?-मी तर आज लष्करांत गेलोंच नाहीं. आणि मी लिलांवात यांहीं खरेदीही केलें नाहीं; असें गृहस्थ आंतूनच बरळत असतां चोर ... नंतर हा गठ्ठा तरमगमहाराजमी घर चुकलों. मालकानें यानच्या पेठेंत आपल्या दिवा -आपल्या घरानजिकच वाटतें--कुठेंतरी पत्ता सांगून मला पाठविलें. पण दा! आतां मेहेरबानी करून मराठी जर या ओझ्याला हात लावून माझ्या डोईवर तें चढवून द्याल तर मी धन्याच्या घरीं नेऊन टाकीन ' गृहस्थानें त्याचें नम्र तेच भाषण ऐकून बाहेर येऊन त्याचें ओझें त्याला उचलून दिलें व चोरानें मनांतले मनांत पदगतीं आपला रस्ता पकडला.

मिठाचें उत्पन्न—इसवी सन १८८३, ८४ सालामध्यें हिंदुस्थानांत मिठाच्या करापासून ६१९३१ रुपये उत्पन्न झालें. पैकीं बंगाल, उत्तर हिंदुस्थान, मद्रास, सिंध, ब्रिटिश ब्रह्मदेश, या निरनिराळ्या प्रांतीं अनुक्रमें १८४९९; १२२१०; १३४६ २,९१३३,२४७,९८ रुपयाचें उत्पन्न झालें. इ प्र.

---

### नोटीस

बनाम मल्हार वल्द उदेभान जात बेलदार राहणार मौजे नांदरवेडा तालुके मलकापुर जिल्हा बुलढाणा यांस नोटीस देणार कृष्णी मर्द ओंकार बेलदार राहणार मौजे जयपुरतालुके खामगाव जिल्हा अकोलें इजकडून लिहून आण्याचे असें कीं सन १८७९इसवी सालांत श्रावणमहिन्यांत तुह्मी मौजे जयपुर येथें येऊन तुमची मुलगी बनाम गंगी ही आमचे मुलास हागजे भगवान वल्द ओंकार याजशी लग्न करून देण्याचे कबूल केले त्यात चार पंच लोक जमा होऊन त्या पंचांसमक्ष सोयरीक करून रोख रुपये पन्नास व दागिने सोन्याचांदीचे किंमत रुपये पन्नास व कापड चिलभर वगैरे मिळून ४१ रुपये व अन्नखर्च वगैरे मिळून नऊ रुपये एकंदर रुपये १५० आमचे खर्च करून पुन्हा तुह्मीं आपले पोरीस दागिना सुद्धां आपलें घरीं घेऊन गेले नुसती सगाई जाहाली होती त्यास अदमासें वर्षे पांच सहा होत आली असाव तुह्मी ठरावाप्रमाणें लग्न करून देत नाहीं हे गैरवाजवी आहे व हल्लीं परस्पर असें समजण्यांत आले कीं सदरील मुलगी आमचे सगाईची बनाम केशव वल्द सानाजी व तानाजी बेलदार राहणार मौजे शीगाव टाकळी तालुके खामगांव याजपासून कांहीं ज्यास्त पैसा घेऊन तुह्मी लग्नकरून देणार आहा हे बरोबर नाहीं करितां तुह्मांस या नोटीसीनें कळविले जाते कीं नोटीस पावल्यापासून तीन दिवसांचे आंत तुह्मी आमचे करारात येऊन चार समजित पंच लोकांत आमचा झालेला खर्चाचा निकाल करून रोख द्यावी. पुढें आपल्या मर्जीप्रमाणें काम करावें जर याप्रमाणें आपण न कराल तर जो आह्मा प्रतिष्ठित आपल्या समजी शिवाय ... करून घेतल्या उपरांतीक अर्जी दिल्यानंतर फिर्याद करून नोटीसीचा खर्च व कोर्ट खर्च वगैरे सर्व भरून घेऊं तदरहू नोटीस दरम्यान कांहीं उत्तर करावयाचें लिहिलेलेंस मुदतीचे आंत केली कळवें पुढें तकरार तुमची येई ... ती ऐकली जाणार नाहीं हे कळावें तारीख ९ माहे एप्रील सन १८८४ इसवी

(सही) पुनवार मुनसी बलदराव लिखित कृष्णी मर्द ओंकार बेलदारी ण राहणार मौजे जयपुर.

---

हें पत्र आकोला येथें के०बा० खंडेराव बाळाजी यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यात नाराय ... यांनीं छापून प्रसिद्ध केलें ...

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XVIII AKOLA MONDAY APRIL 28 1884 NO 24

वर्ष १८ अकोला सोमवार तारीख २८ माहे एप्रील सन १८८४ इ० अंक २४



## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु० |
| वर्षाची आगाऊ | ५ |
| सहामाही ,, | ३ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांक हांशील. | |
| वर्षाचें आगाऊ | ०१३ |
| सहामाही | ०८ |
| साल अखेर | १०८ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून आगाऊ वर्गणी यावी झणजे पत्र सुरूं केलें जाईल.

## नोटिसींबद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०३ |



*WONDERFUL SARSAPARILLA!*

This preparation containing all the medical properties of the valuable drug Sarsa, combined with some other useful ingredients, is *guaranteed* to cure obstinate skin diseases, syphilitic eruptions, constitutional syphilis, loss of appetite Nervous and General Debility, costiveness, venerial sores, and all other affections arising from the abuse of mercury.

*per bottle Rs 1 Packing As 4 Per doz Rs 11.*

Specifics for Spermatorrhœa Gonnorrhœa, Gleet, Syphilis, and mpotence. In bottles Rs. 2 and Rs. 4 Packing Ans. 4 *Cure guaranteed* In failure the money will be returned.

CURE FOR HYDROCELE.

*Guaranteed* to cure cases to long standing. Warranted to be free from mercury or other injurious drugs. In pots Rs. 2 and Rs. 4 Packing Ans. 4 Per doz. Rs. 21 and Rs. 40

W. Rooder and Co Surgeons Calcutta

*ADVERTISEMENT.*

We beg to inform the public that we have been appointed Agents for the undermentioned Insurance Companies and that we are now prepared to accept on their behalf Insurances Against Fire Unorpurporses, Mills, and ing of those Household— English. He Wares are Merchandise at most favorable terms.

We will be glad to furnish full particulars on application.

*Bombay* Fire Insurance Company, Limited.

Transatlantic Fire Insurance Company.

North German Fire Insurance Company.

Lubeck Fire Insurance Company.

Samarang *Sea* and Fire Insurance Company.

Batavia Sea and Fire Insurance Company.

Fire Insurance Company Insulinde.

Breul & Co.

Akola
16 April 1884.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं खालीं लिहिलेल्या आगीचा विमा उतरण्याच्या कंपनीच्या तर्फे आह्मास एजंट नेमिलें आहे. आह्मी त्यांच्या तर्फे फार किफाईतवार दरानें आगीपासून घर, गिरण्या, इमारती, घरगुतीसामान, माल आणि सर्वप्रकारचे व्यापाराचे जिन्नस यांचा विमा उतरण्यास तयार आहोत. ज्यास्त माहिती खालीं सही करणाराकडेस मागितली असतां मिळेल.

बांबे फायर इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ट्रान्स आटलांटिक फायर इन्शुरन्स कंपनी नार्थ जर्मन फायर इन्शुरन्स कंपनी ल्युबेक फायर इन्शुरन्स कंपनी समरांगसी आणि फायर इन्शुरन्स कंपनी बटेव्हि आसी आणि फायर इन्शुरन्स कंपनी फायर इन्शुरन्स कंपनी इन्सुलिनडी.

आकोला
ता० १६ एप्रिल सन १८८४ } ब्रुएल आणि कंपनी


## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्या या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस.

वि. वि. मला उत्पन्न झालेली शंका ती अशी कीं " साधू कोणांस ह्मणावें " सांप्रत साधू ह्मणविणारे असे पुष्कळ लोक आहेत. त्यांच्या पूर्वजांनीं आपल्या साधूत्वा बद्दल सर्व भरत भूमीवर डंका वाजवून शेवटीं यमसदनाची वाट धरली, अशीं कांहीं घराणीं आपल्या विदर्भ देशांतही पुष्कळ आहेत. व हल्लीं आपण साधू आहोत अशाबद्दल जगतांतलावर डंका वाजविण्यास मागें पाहत नाहींत.

महाराज, साधूंचीं लक्षणें कोणतीं या विषयीं मी फार अज्ञान आहे करितां त्यांचे दिग्दर्शन आपल्या येथ्या अंकीं झाल्यास फार आभारी होईन.

जे जे ह्मणून आपल्या साधूत्वा बद्दल बाणा बाळगतात ते सर्व, विचाऱ्या अज्ञान गतभर्तृकां पुढें पूर्व कर्म कथाचें पातडें वाचून अगर अज्ञान वयोवृद्धांच्या पुढें " विठ्ठल विठ्ठल पांडुरंग " इत्यादि बड्या शब्द समूहाचा घोष करून वाया बांपड्या नाडवून आपल्याउदर भरणार्थ तजवीज करितात असा प्रकार दृष्टीगोचर होतो.

अज्ञान गतधवांना अगर अनाडी वृद्ध जनांना नाडवून त्यांच्यापासून गुरु दक्षणा ह्मणून द्रव्य उपटून आपल्या घशांत ओतणारे जे आहेत यांना साधू ह्मणावे काय ? अथवा धात्वादिकाचे तुकडे ( टाळ ) दोन्ही हस्तांत घेऊन, भगवीं वस्त्रें परिधान करून, अथवा सर्व काया भस्म चर्चित करून काळ घालविणारे आहेत त्यांना साधू हा किताब देता येईल काय ? अमुक गोष्ट करण्याबद्दल साधू बाबाचा नियम ठरल्या नंतर तो बेत फिरविण्यास साक्षात् विधाता समर्थ नाहीं तर मग मानव कोठून ? इत्यादि वल्गना करणारे साधू कांहीं दृष्टोत्पत्तीस आले आहेत. साधूबावांची पूर्वबुद्धि कोठ पर्यंत ह्मणाल तर जोंपर्यंत एकाद्या बड्या श्रीमान गृहस्था कडून अधिक लक्ष देणारी निमंत्रण चिठी आली नाहीं तोंपर्यंत चिठी आली कीं साधूबावाचे मतें फिरलें. माहाराज अशा ह्या आधुनिक साधूंची तुलना इसाप फेबल मधलि बोकशाशी केली तर शोभेल. नाहीं बरें!

" सर्वांभूतीं सम ठेवूनीया बुद्धी, सांडावी उपाधि प्रपंचाची" नामदेव ह्मणतो प्रपंचाची सर्व यातायात सोडून देऊन सर्व प्राणीमात्रावर समान बुद्धी ठेवणारा साधू. अशांना द्रव्य लाभाची आशा कशा करितां? ज्यानें काम क्रोधादिक साहा शत्रूंचें दमन करून आपले लक्ष ईश्वरी निरंतर लाविलें तोचना साधू? किंवा ऐहिक सुखासाठीं घरसोड करणारे त्याना साधू ह्मणावें? असे साधू आपल्यास साधू न ह्मणवून घेतील तर फार चांगलें होईल कारण " जैसा बोले तैसाचाले, त्याची धरावी पाऊले "

तुकाराम.

अशा साधूना अज्ञान लोक वंदन करून आपली धन्यता गातात ते कोण ह्मणावें? वरील अभंगावरून तर खात्री होते कीं ज्यांच्या बुद्धीचें शाश्वत नाहीं पण आपणाला साधू ह्मणवितात ते शहाणे!

तुकाराम ह्मणतो.

नाहीं मिळत संतपण हाटीं हिंडतां कपाटीं रानीं वनीं॥ नये मोल देतां धनाचिया राशी॥ नाहीं तें आकाशीं पाताळीं जें

यावरून दिसते कीं असले अविश्वसनीय साधू लोक खरे साधू नसतात. कारण

भिक्षा पात्र अवलंबणें॥ जळो जिणें लाजिरवाणें॥ ऐशियाशी नारायणें॥ उपेक्षिजे सर्वथा आपुले मनाचें करुनीया खंड जनांमध्यें भांड पोट भरी॥ नाम गावूनिया जे कां द्रव्य घेती। नणो त्यांचा गति कशी होय।

तुकाराम

साधू ह्मणवून किर्तन करणारे व मुखपत्रें करून ज्याचे वाणीचे चांचल्य त्यांना साधू ह्मणूं नये तर "भांड" ह्मणावे असें दिसतें व त्यांची गति काय होणार हे तुकाराम महाराजानींच सांगयाला मागें पाहिले तर दुसरी गति कोणती असणार × × वास साधूमहाराजांचे किर्तन संपत नाहीं तोंच बिदागीची तयारी पाहिजे वरील अभंगांच्या उताऱ्यावरून स्पष्ट दिसतें कीं आधुनिक साधू आपमतलबी असत्य वादी असतात.

काय गळ्यांत घलुनि तुळसीची लाकडे

देवनाथ.

देवनाथच्या ह्मणण्या प्रमाणें वरील डामडौल दाखवून अज्ञान जनाना बोधामृत न पाजतां द्रव्य संचय करणारे असत्यवादी साधू आपल्या कंठी धारण केलेल्या तुळशीच्या माळा तोडून इतरजना प्रमाणें व्यापार उद्योग करतील तर देशाचे कल्याण होईल. अशा साधूंना लोकांनीं वंदन करणें हे सुद्धां तुकाराम महाराजास संमत नाहीं असें दिसतें.

आतां सर्वच साधू याप्रमाणें असतील असा माझा ह्मणण्याचा हेतु नाहीं परंतु बहुतेक असें दिसतात करितां शंका उत्पन्न झाली. खरे जे साधू असतील त्यांनीं यालेखाबद्दल क्षमा करावी.

नागपुर.
ता. १७-४-८४. एकशंकित विद्यार्थी.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध ३ शके १८०६

हिंदुस्थान सरकारचे फिनान्स आणि कामर्स खात्याचे अंडर सेक्रेटरी मि. ओकोनोर यांनीं सन १८७८ पासून १८८२ पावेतों हिंदुस्थानच्या व्यापारा संबंधी खर्डा तयार करून पार्लमेंट सभेपुढे ठेविला त्यांत त्यानीं सिद्ध करून दाखविलें कीं हिंदुस्थानच्या व्यापाराची उत्तरोत्तर चढती कळा आहे. सन १८७८ सालीं दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानात मोठा दुष्काळ पडला होता. त्यामुळें व्यापारास मोठा धक्का बसला होता पण तेव्हांपासून एक सारखे व्यापाराचें जें मान वाढत आहे त्यावरून मि. ओकोनेर यांनीं दुष्काळ वगैरे संबंधाच्या सर्व अडचणी मनांत आणून असें अनुमान केलें आहे कीं पुढील वीस वर्षांत व्यापार हल्लीं पेक्षां दुप्पट वाढेल सदरहू वाढतीचें मान दिसण्यांत जरी फार

मंद दिसतें तरी हिंदुस्थानच्या मानानें एकंद रींत तें बरेंच आहे असें त्यांचें मत आहे मागिल दहा वर्षांत हिंदुस्थानांत येणाऱ्या मालाचा खप शेकडा९८व बाहेर जाणाऱ्या मालाचा खप शेकडा ९१.७९ वाढला. हीं दोन्हींप्रमाणें जरी बरींच जवळ जवळ आहेत तरी बाहेरें जाणाऱ्या व आंत येणाऱ्या मालाचें मान निदान सारखें असल्याशिवाय व्यापाराच्या संबंधानें देश चांगल्या स्थितींत आहे असें ह्मणतां येणार नाहीं आपणास जें देणें आहे त्यांच प्रमाणांत अथवा त्यापेक्षां अधिक लोकांकडून येणें असेल तरच आपली स्थिती बरी आहे असें ह्मणतां येईल. तसेंच हिंदुस्थानाच्या सध्याच्या स्थितीस ज्या गोष्टीची जरूरी लागते तितकीच किंवा त्या पेक्षां अधिक जरूरी जर हिंदुस्थानातील मालाची इतर राष्ट्रास पडेल तरच हिंदुस्थानच्या व्यापाराची बढती दिवसेंदिवस अधिक होत जाईल. हिंदुस्थानचा व्यापार मुख्य वेंकरून युरोपांतील राष्ट्रांशीं व अमेरिका, चीन, इराण, अरबस्थान, सीलोन या देशाशीं चालतो व ह्या पैकीं फक्त युरोपाशीं सुएझच्या कालव्यानें शेकडा ६२ $\frac{0}{4}$ व्यापार चालतो. अलिकडेस देशीं व्यापार व कला कौशल्य यांस उत्तेजन मिळावें याकरितां जो देशीं माल युरोपांतील मालासारखाच असून किमतीनें ही सारखाच पडतो असे कागद दारूगोळा, हत्यारें, यंत्रें, वगैरे जिन्नस होईल तितके याच देशांत विकत घ्यावेत असा सरकारचा ठराव झाला आहे. त्यापासून व्हावा तसा फायदा झाल्या सारखे जरी दिसत नाहीं तरी सन १८८०पेक्षां सन १८८२-८३सालीं सुमारें तीन लक्ष रुपये कमी किमतीचा माल हिंदुस्थानांत आला. ह्या मालाचा पुरवठा दिवसोंदिवस आधिकाधिक होत गेला व सरकारचा आश्रय ही उत्तरोत्तर ज्यास्त मिळत गेला तर हेही एक व्यापारोन्नतीस कारण होईल. मागील कांहीं सालापासून हिंदुस्थानांत सोनें अधिकाधिक येत आहे व मागील पांच सालांत १४ $\frac{1}{4}$ कोटी रुपयाचें सोनें आलें. त्याच काळांत सुमारें २८ $\frac{0}{2}$ कोटी रुपयांचें रूपें ही आलें व त्या पैकीं इंग्लंड इंटली व चीन या देशांतून आलें. ह्यावरून देशांची समृद्धी दिसून येईल पण हे जिन्नस हिंदुस्थानांत येऊन हिंदुस्थानांतच राहिले असतील व नेटिवांचे घरांत असतील तरच ते हिंदुस्थानांत आल्याचा उपयोग. हिंदुस्थानांतील समुद्र कांठच्या सर्व प्रांतांपैकीं मुंबईहून इतर राष्ट्रांशीं मोठा व्यापार चालतो. कारण तेथून वायव्येकडील प्रांत व पंजाब या प्रांतांत माल जाण्यास दिल्ली पावेतों थेट रेलवे आहे. ह्या दोन प्रांतांत उत्पन्न होणाऱ्या गव्हाचा खप युरोपांत फार आहे व तो सर्व माल मुंबई मार्गानें तिकडेस जातो.

---

गेल्या अंकीं लिहिल्या प्रमाणें येथील लायब्ररीचे समारंभाची हकीकत ह्या अंकांत मराठींत देण्याचा आमचा इरादा होता, परंतु इंग्रजींत त्या मजकुरास आमचे आटोक्याचे बाहेर जागा लागली असल्या कारणानें स्थल संकोचास्तव ती शाक्षांस प्रस्तुत देतां येत नाहीं.


The Berar Samachar

MONDAY, april, 28, 1884


## THE OPENING CEREMONY OF THE BABUJI DESHAMUKH

### AKOLA NATIVE GENERAL LIBRARY

The members of the managing committee of this institution invited the public of Akola, as communicated in our last, to a grand meeting held on the morning of Monday the 21st instant at the opening ceremony of the new Library buildings that were just completed and declared fit for occupation and of which the foundation stone was laid, as our readers might remember only during the preceedig year. There were present all the *elite* of the town; Natives as well as Europeans and no expense or trouble was spared to make the occassion as grand and charming as it was in the power of the managers to do The presidential chair was taken by our worthy and energetic Depeuty Commissioner, Colonel Fitz Gerald who had timely come to the spot bringing his two daughters with him to grace the occassion. After all had taken their seats Mr Dattatrya Vishnoo Bhagavat secretary to the Library read the following able report which being very exhaustive we have thought it fit to give in *extenso* in our today's issue ——

Colonel Fitzgerald, Ladies, and gentlemen,.:——— ————————

You have been already informed of the object for which we meet this morning. It is to declare this small yet beautiful house open for the use of the general subscribers of the Library. But before we proceed to this business. I shall read a report, giving the histoy of the Library, its future prospects and a description of the progress of the work the completion of which we have assembled to celebrate

It was but a few years back that the Akola Native General Library was founded. And yet the circumstances of its beginning have become matters of tradition. The existing imperfect records do not show how the Library was first established, or how it has fared since its institution. But I will narrate to you the story of its career as told to me by Mr Shriram Bhicaji Jathar and Mr Yeswantrao Clerk of Court small causes; and put it on record on the present occasion "In the year 1862, when schools were first established in Berar, Mr Vishnupant Pisolkar, now a high officer in the Nizam's service, was appointed Head Master of the English school at Akola. Being an enlightened man and knowing well the advantages of a Library he started one at Akola. But at that time there were few natives in this town capable of properly appreciating the advantages of learning; and so when Mr Vishnupant was transferred to Amraoti the institution died a natural death: No endeavour was made to reopen it until 1866; a year which forms an epoch in the administration of Berar for that year witnessed the establishment of a separate department of Education, and was followed by considerable literary activity. A news paper was first started in Akola, and the Library whose very existence was forgotten was reopened in 1867. The energetic Dastur Bymanjee Jamaspjee now C I E collected public subscription and a beautiful and very conveniently situated Library house was built abutting on the bend in the road passing by Sahu Gangadher's shop. These were the most prosperous days of the Library. Every evening its room were crowded with readers and weekly meetings were held under its roof to discuss various subjects. But unfortunately this house fell by the heary rains of 1870; and its site and materials were lost to the use of subscribers. The houseless institution began now gradually to languish until new life was put into it during the Secretaryship of Mr Deorao Vinayak then newly rising to distinction. For 14 years from 1870 to 1884 the Library had no house of its own; and it had to change its residence during this period according to the demand of house rent or the benevolence or convenience of house owners."

It will be seen from this account that twenty years have passed over this institution. During this time it had to weather many difficulties. Once, soon after its beginning, it was actually closed; while throughout almost its whole career it led an unsettled, nomadic life. I trust that these adverse days have now for ever passed and that the institution has entered upon a more prosperous period of life. It has already a name; and shall henceforward have a local habitation, and lead a settled life of unbroken continuity. I have always been firmly convinced with many and the most influential members of the Library that a society intended to endure and continue through many generations, but constituted of ever changing and inconstant materials, can never exist long unless it was connected with something that was stable and lasting. A literary partnership whose functions consist in the accumulation of the means of knowledge and amusement, and whose labours, by their very nature, must extend through many years, will ill perform its duties when its members change almost every month and there is nothing to bind them into one successive whole. Many of us therefore thought of connecting the institution with *land*; and by means of that union knit into continuity the changing elements of the partnership with its accumulations, traditions and records. We thought moreover that while the ownership of a house would make us independent of the caprices of house owners, it would impress us with a character of permanency and give us dignity which we had not possessed before. But we had little or no funds and this caused some to hesitate There was however an extreme party among us, resolved to have a Library house and these carried the day. The Library had a balance of 400 Rs It we could not build a good house we were able to build a hut; and a hut at least we should have. Happily we were not reduced to this extremity. The members of the Native club opened a subscription list and money was liberally contributed. Many gave as much as one year's Town fund Assessment; in several instances the contribution was greater. God helps those who help themselves. The Deshmukh of Maisang was pusuaded to assist us with a munificent gift of 1000 rupees by his friend Mr Ardesar whose name we will always hold in remembrance. Without his kind efforts the Library could not have been built on anything like its present scale As for the Deshmukh of Maisang Babuji Sakharam we have inscribed his name over the entrance and it will be remembered with intense feelings of gratitude as long as this institution lasts Our thanks are due to the President, Vice President and other members of the Municipality who unanimously and without hesitation granted us a spacious and prominent site for building and in an hour of difficulty supplemented this gift with the addition of 500 rupees. Mr Shapurji kindly sent us 100 rupees from Akote while Mr Ramrao Deshpande of Balapoor and Mr Sakharam Vittal and his friends have promised contributions of 100 and 150 rupees respectively. And I am glad to tell you that only a few minutes ago my friend Mr Namdev Rajana subagent of Rally Brothers has given 101 rupees to the Library. But while we make special mention of these donors a word is due to those gentlemen who contributed in small sums of 1 and 2 rupees These small contributions did not come from savings. In many instances what was given was so much deducted from the necessities of life, Of such efforts and sacrifices we may well be proud; and so long as this spirit of self help and this beneficial sense of the value of learning line and actuate us the interests of the Library are safe For my own part I am very sanguine about the growth of this institution; only we should entrust it to the care of those who most love the work. The rich traders, sojourners as well as permanent inhabitants of the town did not contribute to the building fund. These gentlemen have little leisure or interest in Educational institutions. The amount of public subscription therefore was small amounting to Rs 513—6— as it came from a small section of the population, many of whom are not well to do people. Our thanks are moreover due to Messers Ardesar. Gopalrao Savarkar, and Sadashivrao Bhagvat; who had the sole charge of constructing the building. Among these we are specially indebted to Mr Gopalrao for the unwearied attention he bestowed throughout the long time the building was under cons r ction. Lastly we m st not forget Shek Ibrahim and Mestry Ramchandra Vinayak, especially the former. I am afraid Shek Ibrahim has made little profit in this Library business. This society will soon mark its sense of the services of these contractors by the bestowal of the presents on them.

On the 27th February 1883 Miss Fitzgerald was kind enough to do us the honor of laying the foundation stone of the building. The actual work was soon after begun and prosecuted with vigour that it might be completed before the rains. But unfortunately there occurred much delay in the arrival of wood from Nagpore and the building remained incomplete exposed to the heavy rains of this last year Some damage and much delay were the consequences. The total cost of the building has amounted to Rs 2866—10—5; fully 966—10—5 in excess of the original estimate. The building committee will explain in detail how this excess was caus[illegible] But as I have happened to glance Akola 26 4-84 may briefly tell yo
the substitutic
of mud plaste

---

## वर्तमानसार.

mensions of the room in which we sit the necessity of taking a deeper foundation and raising the plinth to the level of the road and by a serious omission in adding up the sums in the original estimate. I will not encroach upon your time by further touching on this subject. I will only repeat what I have already said that we are very much obliged to Messers Ardesar, Gopalrao and Sadashivrao for the time, labour, and attention they gave in accomplishing the work committed to their care

As regards the future prospects of this institution and its financial condition I am very hopeful From the beginning of the current year we have opened a new class of subscribers paying 2 rupees a month and by the earnest endeavours of my colleagues in the managing committee and other members several new subscribers have been gained. The annual income of the library is estimated this year at Rs 560. The expenditure would be Rs 302 leaving a balance of Rs 258. At present the Library has not even the necessary furniture. There is a case of books, but of these 6or 7 only are useful. But if the present state of things continues long enough, in a few years we shall be able to buy the necessary furniture and many useful books. In short we are of the belief that this society has now entered upon a path of continued prosperity and growth. But we shall have failed in discribing to you the future prospects of this institution, if we allow you to go home with the impression that we can now do without your cordial and sympathetic cooperation. We are formed on the principle of selfhelp and mutul exchange of benefits. The more numerous we become therefore the greater would be the sum of advantages each of us would share. Besides this the duty of educating ourselves by pursuing the studies left at school and perfecting by their daily application to questions of administration and reform, is left to our sole unaided care. There is no State Department to encourage the instruction or provide for the amusement of the adult and the old. Indeed it would be unworthy of those who may help themselves to look to the help of others. Now I put to you could this vast and solemn duty of self education when the means of it are so dear, be appreciably accomplished by the isolated efforts of 40 or50men, many of them not well to do people? No when the object to be effected is large, our cooperation also must be proportionately large Again few of us could I believe buy all the books and news papers that they might desire to read; in the majority of cases the desire to read and improve is limited by the facilities we posses; Every one of us has numerous leisure hours at his disposal which for want of better employment are allowed to be wasted in goss p How beneficil would it be then it we united to make the means of knowledge cheaper and easy of access, and utilized these vast resources of leisure and intellectual energy? We beseech you therefore not to pitter away your money in separate efforts but cooperate with us for mutual advancement and benefit.

After the above report was finished Mr Deorao Vinayak explained its purport for the understanding of those who did not know English. He was followed by Mr R. A. Panbalkar who gave a short speech extolling the munificence of some of the Deshmukhs of Berar and in particular of the Deshmukhs of Mhaisang Ugva, and others. Finally Mr S V Bhagvat rose up and spoke in Marthi after which the President gave out extempore address that wasvery able instructive and suited to the occassion but which we are deeply sorry we are not able to give in our today's number. After it was finished Pansupari, flowers, garlands, nosegays, attar, gulab, were distributed to the whole company when Mr P. N. Bhat as President of the Library meeting, proposed a vote of thanks to the President for his able conduct in the chair which was unanimously carried out. The whole company then dispersed well gratified at the new beautiful Library building that was really an ornament to their town.

## वऱ्हाड.

पार्शी लोकांचे मुख्य गुरु सरदार खान बहादूर दस्तूर नसरवानजी जामासजी यांची आणि नवीन रेसिडेन्ट सर आलिव्हर सेंट जान व मि. कनिंगहाम साहेब यांची गेल्या १९ वे तारीखेस मुलाखत झाली. त्याच्या दुसरे दिवशीं रविवारीं दस्तूर बहादूरांना त्यांच्या सन्मानार्थ सिकंदराबादच्या पार्शी मंडळींनीं एक टीलेजंग खाना दिला.

मेजर इ. जे. गनथार्प अकोले जिल्ह्याचे पोलिस सुपरिंटेंडेंट यांनीं दोन वर्षांची फर्लो घेतली व ते आतां येत्या महिन्याच्या पहिले तारीखे पासून आपले कामाचा चार्ज देऊन विलायतेस जाणार असें कळतें.

सर्जन चार्लस लिटल एम. डी. सानिटरी कमिशनर हे सर्जन मेजर झाल्याचें गव्हर्नमेन्ट ग्याझेटावरून समजतें.

वाशिमचे असिस्टंट कामिशनर मि. डेव्हिस साहेब हे मि. फिट्झप्याट्रीक रजेवर आहेत तो पावेतों वाशिम जिल्ह्याचे डिस्ट्रिक्टरजिष्ट्रारचें काम पाहतील.

रा. रा. देवराव जयकृष्ण यांनीं पुढील हुकूमा पावेतों एक्ट्रा असिस्टंट कमिशनरचें काम पाहावें आणि मि. निजामुद्दीन साहेब यांजकडून अकोट येथील दिवाणी कोर्टाचा चार्ज घेऊन ते रजेवर आहेत तितके दिवस दिवाणी काम चालवावें असें ठरल्याचें रेसिडेन्सी आरडर वरून समजतें.

येथील डेपुटी कमिशनर कचेरींतील नाझर मि. शापुरजी वीरजी यांनां रा. रा. देवराव जयकृष्ण यांचे जागीं अकोटास आक्टिंग तहसिलदार नेमिलें.

सयद नुरुद्दीन रेसिडेन्ट साहेबांचे अव्वाची यांनीं आणखी दोन महिने रजा वाढविली आहे. या दोन महिन्यांचा त्यांस अलावन्स मिळणार नाहीं.

मि. जे. एच. हान्डले असिन्टन्ट इंजिनिअर डी. पी. डब्ल्यू. यांची ब्रिटिश वऱ्हाडाहून हैदराबादेत बदली झाल्याचें समजतें.

रा०रा० वणुगोपाळ मुदलियर येथील ए० इं० चे आफिसातील अकाउंटेंट यांची बदली सिकंदराबादेस झाली, व त्यांचे जागीं तेथील कोणी बाबू गृहस्थ येणार असें समजतें.

रा० रा० पुरुषोत्तमराव नारायण भट येथील ट्रेझरी आफिसर हे इतके दिवस २ रे ग्रेडचे एक्स्ट्राट अ०कमिशनरचे होते तेयेत्या १ ले तारखे पासून रु० ६०० चे १ ले ग्रेडचे ए०अ०क० होतील, व त्या तारखे पासून येथील स्मालकाज कोडताचे जडजाचें काम पाहतील अशा विषयींचा हुकुम गेल्या ग्याझिटाचे अंका मध्यें प्रसिद्ध झाला आहे. ही बढती व योग्य नेमणुक पाहून आह्मांस मोठा संतोष होतो.

मागील एके अंकांत लिहिल्या प्रमाणें येथील तहसीलदार मि० अरदेसर दिनशाजी विनाय यांस रु० २५० वर एक्स्ट्रा अ० कमीशनर नेमिलें.

रा०रा० गोपाळ रामचंद्र पिटके बि.ए. ह्यांनीं गेल्या शुक्रवारीं येथील हायस्कुलच्या फर्स्ट असिस्टंट मास्तरचे कामाचा चार्ज घेतला.

उमरावती हायस्कूलांतील विद्यार्थ्यांनीं गेल्या शुक्रवारीं रात्रौ संस्कृत शाकुंतल नाटकाचे पहिले चार अंकांचा प्रयोग करून दाविखला. नाटकगृह त्या दिवशीं अगदीं गजबजून गेलें होतें. बहुतेक पात्रांनीं आपापलें काम चांगलें केलें ते संपल्यावर 'न्यायदंडन अथवा चोख निवाडा' ह्या ही मराठी नाटकाचा प्रयोग त्यांनीं चांगला केला.

रा०रा० पुरुषोत्तमराव नारायण हे वर लिहिले प्रमाणें स्मालकाज कोर्टावर गेले ह्मणजे त्यांचे खजान्याचें काम मि० आलिमुद्दिन अव्वाची साहेब हे पाहतील असें समजतें. रा० पुरुषोत्तमरावजीचे अंमला खालीं येथील खाजिन्याची चांगलीच सुधारणा झाली, व सर्व व्यवस्था चोख व वाखाणण्या सारखी होती. तरी ती तशीच पुढेंही राहील असें आह्मी मना पासून इच्छितों.

येथील स्मालकाज कोडताचे जडजांस ५ वे ग्रेडचे दिवाणी कोर्टाचा जो अधिकार आकोला व बाळापुर ह्या तालुक्या पुरता मात्र होता तो अ० रेसिडंट साहेबांनीं सर्व आकोट तालुक्याभर वाढाविलाआहे.

यवतमाळ.२१-४.८४.

या ठिकाणीं एका गरीब ब्राह्मणावर अगम्यागमनाचा आरोप पुष्कळ दिवसापासून होता. परंतु श्रीमंतशंकराचार्यांचे शिष्यांची स्वारी येथें आली होती त्यांनीं प्रायश्चित्त देऊन आरोपितास दोष मुक्त केलें. हें त्यांस भूषण आहे. कांहीं लोकांचीं मनें अद्याप साशंक राहिली आहेत. आजच्या काळांत आचार विचाराचा घर बंध किती राहिला आहे हें पाहून कालानुरूप वर्तन ठेवणें हेंच विहित आहे. ज्ञाति संबंधानें बखेडा होण्यांत कांहीं जीव नाहीं.

मागें लिहिल्याप्रमाणें मि. नारायणराव गद्रे येथें दाखल झाले. व रा. रा.काशिनाथ यादव जु. क. साहेब यांचे आफिसांत गेले हा जिल्हा एका बाजूस असल्यानें व इतरकारणामुळें येथें बहुत लोकांस वर्षेंच्या वर्षें रखडावें लागतें असें प्रसिद्ध आहे. असें असल्यामुळें काशिनाथपंत यांस त्यांच्या बदलीमुळें बरीच उमेद वाटेल व ती वाटणें स्वाभाविक आहे.

येथील डे. क. आफिसांतील क्लार्क मि. जे. हिल यांचा ता. १९ रोजीं देवीचे आजारानें अंत झाला. हे अल्पवयी गृहस्थ स्वभावानें गरीब असून होतकरू होते.

मि. हिल साहेब हेड क्लार्क यांनीं या महिन्याचे पहिल्या तारखेस पेनशन घेतलें. व मि. उ. शामरंट यांची त्या जाग्यावर नेमणूक झाली.

मि. आत्माराम अनंत एलिचपूर येथून काल रोजीं येथें दाखल झाले.

मि. गोविंद गंगाधर दामले अ. डेप्युटी क्लार्क हे आतां दारव्ह्यास परत जातील यांजविषयीं दोन शब्द येथें लिहिले पाहिजेत. हे गृहस्थ विद्वान् आहेत, कामांत हुशार आहेत व यांची कामाची शैली चांगली आहे. तरी या बद्दल येथें विशेष लिहावयाचें नाहीं, कारण कीं हे कांहीं असाधारण गुण आहेत असें नाहीं परंतु यांचा मन मिळाऊ स्वभाव यांचे मंडळींचें अगत्य आणि सर्व बाबदींत नेमस्तपणाचें यांचें वर्तन हे गुण तारीफ करण्यासारखे आणि ह्मणून अनुकरणीय आहेत. व्यर्थ स्तुतीनें जागा भाटाविण्याचा हा लेख नसून केवळ अनुभव सिद्ध असें एका सूक्ष्मदर्शीचें मत प्रगट केलें आहे. अशा योग्य गुणांनीं लोकप्रियता संपादणें स्वाभाविक आहे हें उघडच आहे.

येथें एका तेल्याची १२ वर्षांची मुलगी विहिरींत पडून मरण पावली. विहिरींचीं तोंडें नीट बांधिलीं तर अशा अपघातांची संख्या कमी होईल.

येथें केळापूरचे देशमुखांचा एक बडा दावा सुरू आहे. त्यामुळें वकील मुखत्यार वगैरेची बरीच गर्दी होऊं लागली आहे. मोठ्याचे भांडणांत कधीं गरिबांचा चुराडा होतो व कधीं त्यांची पोळी पिकते.

या लहानशा ठिकाणीं मदिरापानाचा बराच प्रसार झाला आहे आणि त्याचीं स्वभाविक फळें त्यांचा तद्भक्तांस आस्वाद घेण्यास मिळत आहे.

डे. ए. इ. यांची स्वारी हल्लीं येथें आहे व दारव्ह्याचे हेड मास्तर मि. अंताजीपंत हे हल्लीं येथें आले आहेत.


## NOTICE

Tenders are invited for the construction of various works in the Local Fund Department

Specificetions with forms of Tender will be obtained in the Local Fund office Akola

The contracts will have to be completed within a given period

No reason will be assigned for the rejection of any Tender.

नोटीस.

लोकलफंड खात्यांत निरनिराळे प्रकारचीं कामें करण्याबद्दल मक्ते देणें आहेत. कारितां ज्यां कोणास मक्ते घेणें असतील त्यांनीं आपलीं टेंडरें लोकलफंड आफिसांत आपले पत्रासह पाठवावींत.

कामाबद्दलची विशेष माहिती व टेंडराचे नमुनें आकोलें येथील आमचे आफिसांत मिळतील.

कामें सांगितल्या मुदतींत पुरी केलीं पाहिजेत.

टेंडर नापसंत केल्याबद्दल कारण दिलें जाणार नाहीं.

Walter Laidlaw C E
Local Fund Engineer
Akola District

Local Fnnd Engineer's
Office Akola 26 4-84.


## वर्तमानसार.

अशी बातमी कळते कीं, फ्रेंच लोकांशी लढण्याकरितां चीन देशात कडेकोट तयारी चालली असून नवीन पलटणी तयार होत आहेत. कदाचित परिणाम मोठा चांगला होईल असें दिसत नाही.

फ्रेंच लोकांच्या सैन्यानें हांग्होआ शहरावर कुलपी गोळ्यांचा भडिमार केला. चिनई लोक शहरांस आग लावून दिल्यानंतर आपण चालते झाले.

मर्व्ह रशियानें घेतल्यामुळें पुष्कळ तुर्कु लोकांच्या टोळ्या त्यांस जावून मिळाल्या आहेत.

कोल्हापूरचे महाराजांस विद्याभ्यासाकरितां विलायतेस नेणार ही बातमी शहरांत समजल्या वरून लोक निरनिराळ्या कुतर्कां मध्यें गढून गेले आहेत.

चांदमारीच्या वेळीं निशाण बरोबर धरतां येत नाहीं अशा अर्थाचा एका मेजर सुभेदार यानें शिपायास ठपका दिल्यावरून त्या शिपायास फार राग येऊन त्यानें त्या मेजर सुभेदारास कराची येथें ठार मारलें.

या देशांत आगगाड्या आहेत, दरवर्षी नवीन लाईनी सुरू करण्याचें काम चालू आहे इंग्लंडांहून येणाऱ्या मालावरील जकात कमी केली येथून परदेशी पुष्कळ माल जाऊं लागला व मुख्य फडणीसांच्या मताप्रमाणें जमाखर्चाचा खरडा फार चांगला आहे वगैरे गोष्टी प्रत्यक्ष दिसत असून आमचे लोक गरीब आहेत अशा आह्मीं हाका मारितो यांत काय अर्थ आहे? परवां आनरेबल मि. म्याकेन्सी यांनीं मद्रासेस याच विषयावर एक व्याख्यान दिलें त्यांत त्यांणीं या प्रश्नाचा उलघडा केला आहे. ते ह्मणतात कीं अजूनपर्यंत येथील लोकांची शेतकी सुटत नाहीं. अन्नपाण्याशिवाय बाकी सर्व माल परदेशांतून येथें येतो त्यामुळें सुमारे ४० कोट रुपये इकडून जातात. आपल्यास लागणारा माल आपण तयार केला पाहिजे हें तत्व अजून हिंदु लोकांस समजूं लागलें नाहीं. व अशीच स्थिति राहिल्यास उत्तरोत्तर गरीबीची ग्रहदशा पाठीमागें लागून एखादे दिवशीं हिंदुस्थानचें दिवाळें निघेल. साहेब महसुरांच्या ह्मणण्यांत पुष्कळ तथ्य आहे.

'हिंदुस्थानची दरिद्रावस्था' या विषयावर मि. ए. के. कोनेल. एम. ए. यांणी ईस्ट इंडिया असोशियेशन पुढें एक निबंध वाचला. यांत त्यांनीं हल्लींच्या राज्य चालविण्याच्या पद्धतीस पुष्कळच दोष दिला आहे. आमच्या देशांतील रीतिरिवाज सोडून देऊन परकी देशचे रितिरिवाज आमच्यामध्यें घुसडून दिले आहेत. बहुतेक राज्यकारभार व्यापारी लोकांच्या हितास अनुसरून चालते. इंडिया कौन्सिल मध्यें जीं जुनीं खोडें आहेत त्यांचें विचार कांहीं चमत्कारिक तऱ्हेचे आहेत, इंग्लंडांहून माल येऊं लागला ह्मणून या देशांतील हजारों मागवाल्याचे धंदे बुडाले, रेलवे सुरू होताक्षणीच लाखों मजूर अन्नास लागावे व तिचें काम खलास झाल्याबरोबर त्यांणीं अन्नातही मोताद व्हावें, वगैरे गोष्टींचा विचार फारच उत्कृष्ट तऱ्हेनें केला आहे. हा निबंध इंग्रजी जाणणाऱ्यांनीं लक्षपूर्वक वाचावा अशी आमची शिफारस आहे. ने० आ०

ड्युक आफ कानाट हे पत्नीसह मसुरी येथें आहे.

मद्रासच्या गव्हरनरांचा एक गुप्त खलिता मद्रासटाइम्सपत्रानें प्रसिद्ध केल्यामुळें त्या पत्रकर्त्यास राजवाडा बंद होऊन सरकारी जाहिराती देणे बंद केलें होतें, पण ती बंदी आतां दूर झाली असें सांगतात.

मि. ग्लाडस्टन हे तीन दिवसांत प्रधानाच्या जागेवरून दूर होऊन त्यांच्या जागीं लार्ड हार्टिंगटण होतील असें एकानें भविष्य केलें आहे.

मित्रत्वाच्या नात्याने कंदाहार आपल्या कबजांत घेण्याच्या संबंधानें इंग्रजसरकार व काबूलचा अमीर यांच्या दरम्यान पत्रव्यवहार सुरू आहे असें सांगतात.

गेल्या मार्च अखेरीस हिंदुस्थानांतील सर्व तिजोऱ्या मिळून १३,२३,७६,००० रुपये शिलक होती व १८८३ च्या अखेरीस १४,८२,१६,००० असून १८८२ च्या मार्च अखेरीस १४,९२,२८,००० होती.

थंड हवेवर जाणारे सर्व सिमल्यास दाखल झाले व तेथें पाण्याचा फार टंचाई झाली असून त्याकरतां उपाय योजणेचें सुरू आहे हिंदुस्थानचा पैसा या बड्याच कामदारांच्या चैनीकरतां कां खर्च व्हावा?

कंट्रोलर मिलिटरी आकौंटची मद्रासचीं सर्व आफीसें बंगलोर येथें नेण्याचा विचार चालू आहे.

इजिप्तच्या तुरुंगांत एकंदर २००० कैदी असून त्यांत इन्साफ होण्यावर तहकूब असे १२०० आहेत व यामुळें तुरुंगांत अगदी गर्दी व दाटी झाल्यामुळें इंग्रजकामदार लाइट यांणी इन्साफ होणारे १२० कैदी सोडून दिले व असेच आणखीं सोडून देवून दाटी कमी करावी असें त्याचें मत आहे.

इंग्लंड व वेल्स मिळून पोलीसचे लोक पुढील प्रमाणे आहेतः—आफीसर ६६२; इन्स्पेक्टर १४८८; सरजन्ट ३४८२ व शिपायी २८२,३८. विलायतच्या टाइम्स पत्राचा माजी एडीटर मि. चेनरी नुकताच मेला असून त्याणे जें मृत्यु पत्र केलें त्यांत २,१०,००० रुपयांची मिळकत दाखल केली आहे. टाइम्सचा एकच एडीटर नसतो व हे सर्व एडीटर नोकर असतात!!

ब्लाकसी व कास्पीयनसी आणि पर्शियनगल्फ हीं जोडण्याकरतां पर्शियामधून रेलवेस १२९००,००,००० रुपये लागणार असून त्याच्यायोगानें हिंदुस्थानाकडचा रशियाचा व्यापार दिढीने वाढेल असा रशियन शोधकांचा विचार आहे असें सांगतात.

मद्रासचे आन. मेकंझी यांणी गेल्या १४ च्या तारखेस एका मोठ्या समाजांत नेटिवांस उद्देशून असें बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थानची संपत्ति वाढत आहे असें ह्मणण्यास कांहींच आधार नाहीं. शेतकऱ्यांची स्थिति फार वाइट झाली असून धंदे नसल्यामुळें धंदेवाल्यांचेही हाल होत आहेत व त्याकरतां त्यांत लवकर सुधारणा होणे अवश्य आहे. या सर्वांचें कारण हिंदुस्थानच्या सर्व लोकांस शेतकीवाचून कांहीं मार्ग नाहींसा झाला हें आहे; आणि असें असून ही हिंदुस्थानच्या लोकांस लागणाऱ्या व हिंदुस्थानात तयार होत असलेल्या व होण्यासारख्या अशा शेकडो जिनसा विलायतेहून आलेल्या विकत घेण्यांत येतात त्यामुळें अशी दशा झाली असून त्याबद्दल हिंदुस्थानचे ४० कोटि रुपये दरसाल बाह्यदेशी जात आहेत आणि दारिद्राचें मुख्य कारण हेंच आहे याकरतां हिंदुस्थानच्या लोकांनी त्या परकीय जिनसा न घेण्यासाठीं झटावें हें अवश्य आहे. मि मेकंझी यांचें हें ह्मणणें आमच्या लोकांनी फारच विचार करण्यासारखें आहे, पण आमचे तरुण पुढारी शुद्धीवर येतील तेव्हां खरें.

प्रसिद्ध वारन् हेस्टिंग्स यांची कोणी आप्त मिस हेस्टिंग्स हिच्या वयास हल्लीं १०३ वर्षें पूर्ण झालीं आहेत असें कळतें.

पारीस शहरांत येत्या जुलैंत तान्ह्या बालकांचें-प्रदर्शन होणार आहे. त्याचे अध्यक्षस्थान विक्टार ह्यूगो यांस देणार आहेत; कारण त्यांस मुलाविषयीं फार प्रेम असल्याचें प्रसिद्ध आहे.

विलायतेंतील शाळांतील बरेच विद्यार्थी अतिशय अभ्यासामुळें मरण पावतात, असें उघडकीस आले आहे. आमच्या देशांतही कांहीं अशी हा प्रकार असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

लंडनांत नादारांची संख्या ८४,९२१ आहे आणि ब्रेझिल देशांत १९००००० गुलाम आहेत. पैकीं सुमारे तीन लक्ष इंडियन लोक आहेत.

कालनीज पत्रावरून कळतें कीं दक्षिण आफ्रिकेंत विंटनहेज येथें रेलवेचे सांधे बदलण्याच्या कामावर एका वांदराची योजना केलेली आहे. या ठिकाणचा सांधेवाला गाडीखालीं सांपडून त्याचे दोन्ही पाय तुटून गेले आहेत. ह्मणून त्यानें हा वानर शिकवून तयार केला आहे. तो आपल्या धन्यास गाडींतून जिकडे तिकडे सांधे बदलावयाचे असतात तिकडे घेऊन जातो आणि धनी सांगेल त्या प्रमाणें अगदीं मनुष्यप्रमाणें सांधे बदलून गाडी नीट रस्त्यानें येत आहे कीं नाहीं तें पाहात बसतो. कदाचित् एकादे वेळ तो चुकला तर हा गृहस्थ त्यास सांगतो. ह्या देशांत एके ठिकाणीं हापसांत पंखा ओढण्याच्या कामीं वानराची योजना केलेली आहे असेंहि समजतें.

इराणांत एक नवीन पंथ उत्पन्न झाला असून तो ख्रिस्ती, मुसलमानी व हिंदु मताचें मिश्रण आहे.

स्पेन देशांत एका बाईच्या मुलाला ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिल्यावर उपाध्यानें सांगितलें कीं हें मूल मरण पावलें ह्मणजे स्वर्गास जाईल. आपलें मूल लौकर स्वर्गास जाईल तर बरें असें वाटून तिनें त्यांस जिवें मारिलें!

प्रसिद्ध पिगट आणि हेस्टी खटल्यामध्यें गाजलेले मि. शिफ हे विलायतेस निघून गेले.

सौदान प्रांतांत आपण महमदाचा अवतार पैगंबर ह्मणून प्रसिद्धीस आला जो महादी त्याचा उत्कर्ष पाहून तसाच एक अवतार बोखारा शहरांत उत्पन्न झाला आहे त्याचे नांव महमद अब्दुला बेन ओमान असें असून त्यानें आपल्या नांवास केफसिद ही पदवी जोडली आहे आणि तुर्कस्थानच्या सुलतानाला पत्र द्वारें असें फर्माविलें आहे कीं अविश्वासू लोकाविरुद्ध महमदाचा हिरवा झेंडा लावावा.

हिंदुस्थानांत कोठें तरी मध्यवस्तींत एक मुसलमान लोकांसाठीं युनिव्हर्सिटी असावी अशीं मि. पिलफ्रिडब्लंक यांनीं सुचना केली होती ती लक्षांत घेऊन निजामसरकार आपल्या राजधानींत ती स्थापन करण्याचा विचार करीत आहेत असें समजतें. या प्रयत्नामुळें निजामसरकार आपल्या जातिबांधवांच्याकृतज्ञतेस पात्र होतील यांत संशय नाहीं.

महाराणी व्हिक्टोरिया यांची प्रकृती पुत्र शोकामुळें बिघडली असें कळतें.

सु० प०

---

## बालामृत.

झाडास ज्याप्रमाणें वाढवावें त्याप्रमाणें वाढतें.

मुलांच्या ह्या दिवसांत प्रकृति बिघडून खोकला, किरीम, दमा, आंकडी, मोठी पोटें, बहुत पाणी पिऊन अगर अन्य कारणानीं आजारी पडून त्रास होतो, त्याची वाढ खुंटते व भलतेच प्रसंग गुजरतात तर प्रत्येकानें ह्या अमृताचा उपयोग न करणें ह्मणजे रोग मुद्दाम घरांत आणणें असें होतें. ह्याच्या गुणाबद्दल दाखले चमत्कारिक मिळाले आहेत. हें फार नामी औषध आहे. जंत, अन्न न पचणें, ओकणें, दूध न मिळाल्यानें पांढुरकी, क्षीणता, मोठीं पोटें, आईच्या क्षीणतेपासून काड्यासारख्या अस्थिपार खाणें, हिरवी, काळी किंवा पांढरी हागवण, खोकला, फेंपरें, आंव अतिसार, आंकडी, घरघर, गळ्यामध्यें अवाज, पाय लटके पडणें, दमा, माती खाणें, खरूज, कंडु, फोड आईचा वाईट आहार किंवा रक्त किंवा कोणत्याही प्रकारच्या व्याधीपासून होणारे रोग तात्काळ दूर होतात. किंमत १ रुपया बंगी खर्च ४ आणे सर्व माहितीचा कागद आंत आहे. मुंबईंत कांदेवाडीमेडिकल हालांत व वऱ्हाडांत, वऱ्हाड समाचार आफिसांत मिळेल.

विठ्ठल सदाशिव परांजपे

---

## स्त्री. पुरुष तुलना.

साहसी कोण? पुरुष किंवा स्त्रिया?

हा सुरस निबंध सौ० ताराबाई शिंदे यांनीं रचिला आहे. पुस्तकें पुणें येथें श्री शिवाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलढाणें एथील रा० रा० बापुजी हरी शिंदे हेड क्लार्क नि० डे० कमिशनर यांजकडेस व अकोलें ऐथें वऱ्हाड समाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणें पुस्तक घेणारांस टपालहसील पडणार नाहीं पैसे पाठविणारानें वताळ्या सुद्धा टिकीटें पाठवावीं.

---

हें पत्र आकोला येथें कें० वा० खंडेराव बाळाजी यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यात नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.